५१९
म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय नाटक / काव्य
दा. क्र. ८४५६७
BVBK-0404567



# जानकी

19 AUG 1980

21 APR 1981

# जानकी

( स्वतंत्र सामाजिक नाटक )

म. ग्रं. सं. ठाणे: वाचनालय शाखा.
नों. दि. ......
पु. क्र. ....४५६७........ क्र. ......
वि. ...ना।२५

: लेखक :

ना. सी. फडके

BVBK-0404567

रामकृष्ण बुक डेपो : मुंबई ४

[ या नाटकाच्या पुनर्मुद्रणाचे आणि प्रयोगाचे सर्व हक्क
लेखकाकडे आहेत. ]

मूल्य दीड रुपया

प्रकाशक : वि. र. बाम, रामकृष्ण बुक डेपो, गिरगांव, मुंबई ४
मुद्रक : कृ. ना. सापळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, त्रिभुवन रोड, मुंबई ४

" **जानकी** " नाटक प्रयोग रूपानें रंगभूमीवर आणण्याच्या कामीं सर्व प्रकारची मदत केल्याबद्दल, आणि नाटक रंगदार व्हावें यासाठीं लेखनाच्या बहुमोल सूचना केल्याबद्दल श्री. भालजी पेंढारकर, श्री. बाबूराव पेंढारकर आणि श्री. चिंतामणराव कोल्हटकर यांचा मी फार ऋणी आहे.

—ना. सी. फडके

" **जानकी** " नाटकाचा पहिला जाहीर प्रयोग कोल्हापूर येथें पॅलेस थिएटरमध्यें रविवार ता. २१ रोजीं रात्रीं झाला.

निर्माते......**श्री. भालजी पेंढारकर**
दिग्दर्शक....**श्री. चिंतामणराव कोल्हटकर**
कला........**श्री. ढेरे** (प्रभाकर पिक्चर्स)
संगीत.......**श्री. बेरळे** ( ,, ,, )

## भूमिका

**बाबासाहेब**..श्री. बाबूराव पेंढारकर
**लक्ष्मण**.......श्री. वसंत ठेंगडी
**बिहारी**.......श्री. जयशंकर दानवे
**तुलसी**.......श्री. भीमराव काळे
**राघव**........श्री. मनोहर बागी
**जानकी**.......सौ. कमला फडके
**ऊर्मिला**.......सौ. उषा कर्वे
**मंजू**.........बेबी उषा अत्रे

पुस्तकांत घातलेलें फोटो प्रभाकर पिक्चर्सचे कुशल छाया चित्रकार **श्री. दादा गजबर व त्यांचे सहकारी** यांनीं काढले.



सरदार शितोळयांची थोरली सून जानकी



सरदार बाबासाहेब शितोळे

# १

[ बाबासाहेब शितोळे यांच्या बंगल्यांतील दिवाणखाना. दिवाणखान्यांत कोणी नाहीं. वर माडीवरच्या खोलींत बाबासाहेब तुलसी–रामायणांतल्या श्लोकांचं भजन करीत आहेत तें ऐकूं येत आहे. . .कांहीं वेळानं तुलसी येतो. तो रामपंचायतनाच्या तसबिरीला हार घालून डोळे मिटून उभा राहतो आणि वरून ऐकूं येणाऱ्या भजनाच्या तालावर हळूंहळूं टाळ्या वाजवूं लागतो. . .कांहीं वेळानं उर्मिला प्रवेश करते. ती गांवाहून आलेली आहे. तिच्या हातांत छोटीशी सूटकेस आहे. भजनाचे सूर ऐकून व तुलसीला पाहून ती उभी राहते, सूटकेस खालीं टेकते, व तन्मय होऊन डोळे झांकून घेते. . .थोड्या वेळानं भजन थांबतं, तुलसी तसबिरीला नमस्कार करतो व माडीवर जाण्यासाठीं वळतो. उर्मिला त्याच्या दृष्टीस पडते. तिला पाहून तो क्षणभर दचकतो, पण मग हंसतो. ]

**उर्मिला :** तुलसी ! दचकलास का रे ? ओळखलं नाहींस ?

**तुलसी :** वळकलं म्हंजी ? वळकलंच कीं. न्हाई कसं ? पर तडाक्याला नजर गेली नी वाटलं —

**उर्मिला :** काय ?

**तुलसी :** वाटलं देवाला दया आली. आमची हांक सर्गांत पोचली नी या घराची सोबा परत आली. जानकीच माझ्यापुढं उभी आहेसं वाटलं मला, पायऱ्या

इसरून माडीवर मारनार होतो हनुमानाचं उड्डाण, अन् गावाला ऐकूं जाईल येवढ्यांदा ओरडणार होतों ' धनी तुमची सूनबाई आली. '

**उर्मिला :** अरेरे, तुझा तो भास मीं खोटा ठरविला. मला फार वाईट वाटतं.

**तुलसी :** काय वाईट वाटाया नग. अवो आशेनं वाट बघायची नी तेंच उघडलं तोंड नी ताणलेलं डोळं रंजिसपणानं मिटून उसासं टाकायची या घरांत साऱ्यांना सवंच झालीय् आज सा म्हैनं.

**उर्मिला :** त्या भयंकर गोष्टीला सहा महिने झाले तुलसी ?

**तुलसी :** हां. गेल्या आस्विनांतली गोष्ट. आज गुढीपाडवा. पर माझ्यासारक्या हळव्या मानसाची आठवण इकती चिकट कां काल घडल्यागत वाटातिया ती गोष्ट. त्या आठवणीच्या सावलीनंबी काजळी नाचती नजरंसमोर. आजच्यागत तवाबी तूं इकडं आली व्हतीस नव्हं दोन दिसांसाठीं ?

**उर्मिला :** होय. इथें या दिवाणखान्यांत आपण सारीजणं बोलत बसलों होतों. मंजू तेवढी नव्हती. ती शाळेंतून यावयाची होती. कांहींतरी गप्पा काढून आपण एकमेकाची फसवणूक करीत होतों. खरं म्हणजे आमचा साऱ्यांचा जीव दुसरीकडेच होता. तीन आठवड्यांपूर्वी लाहोराहून जानकीची एकदम तार आली म्हणून राघव तिकडे गेला होता. फाळणीनंतर पंजाबांत लूटमार, जाळपोळ सुरूं झाली होती. लाहोर शहरांत तर कहर उडाला होता. जानकीचे वडील मारले गेले होते. त्यांची इस्टेट, घर जळून खाक झालं होतं! जानकी तिकडे एकटी होती. राघव तिला घेऊन केव्हां येतो अन् जानकी सुखरूप आलेली केव्हां दिसते इकडे आमचे सर्वांचे डोळे लागले होते. तितक्यांत राघव आला. तो एकटाच आलेला पाहून आमच्या काळजांत चर्र झालं. बाबासाहेबांनीं त्याला विचारलं, ' जानकी कुठें आहे ? ' त्यानं त्यांच्याकडे पाहिलं, व मग एकदम त्यांच्या गळ्यांत पडून हंबरडा फोडला " बाबा ! आपली जानकी राक्षसांच्या हातांत सांपडली ! "

**तुलसी :** सहा म्हैन्याचं काळं घोंगडं कानरूनबी अगदीं उघड्या जखमेगत ती भयंकार गोष्ट अजून दिसतिया मला. जित्या मुड्द्यागत वागतों, फिरतों, हिंडतों, कधी भकास हसतोंबी आम्ही या घरांत. पर आंत काळीज–चिंध्या झाल्यात

११८०८

त्याच्या. हरहमेश रामाभगवानाच्या पायावर पडून साऱ्यांची एकमुखी माग, 'देवा, आमची जानकी आम्हांला येकदा दाव.'

**उर्मिला :** देव खरोखर आहे कीं नाहीं देव जाणे ! लाखो माणसांचीं घरंदारं उजाड होत आहेत, बायकांची अब्रू जात आहे, मुलांची कत्तल होते आहे, निर्वासित आसरा शोधीत पळताहेत-तुमच्या या ग्वाल्हेर शहरांत किती निर्वासित आले पाहतोस ना—देव स्वस्थ बसून हे सारं पाहतो ! देवावर विश्वास ठेवायचा कसा माणसानं ? कसला देव अन् कसलं काय !

**तुलसी :** देव दिकून रडव्याला पावत न्हाई. घासल्याबगार कस कळत न्हाई, नी सोसल्याशिवाय पारख होत न्हाई. ठाम सांगतों जानकी परत यायलाच पाहिजे.

**उर्मिला :** तुझ्या तोंडांत साखर पडो तुलसी.

[ तुलसी ! तुलसी ! अशा हांका मारीत बाबासाहेब जिन्यावरून खालीं येऊं लागतात. मधल्या टप्यावर येतांच त्यांना उर्मिला दिसते. ]

**बाबासाहेब :** कोण ? उर्मिला ? ( उरलेल्या पायऱ्या लगबगीनं उतरून तिच्या जवळ येतात. ) केव्हां आलीस ?

**उर्मिला :** ही येते आहे एवढीच. ( तुलसी तिची सूटकेस उचलून आत जातो )

**बाबासाहेब :** पत्र तार कांहीं न धाडतां आलीस ?

**उर्मिला :** एकदमच ठरविलं यायचं आणि आलें.

**बाबासाहेब :** फार बरं झालं तूं आलीस, आज एका लहानशा फिकिरींत आहों आम्हीं.

**उर्मिला :** कसल्या ?

**बाबासाहेब :** आज मंजूचा वाढदिवस आहे.

**उर्मिला :** होय ? बरं झालं मी तिला सुंदर साडी घऊन आलें. पण मंजूचा वाढदिवस आहे ही फिकीर कशी म्हणतां ? ही तर आनंदाची गोष्ट आहे.

**बाबासाहेब :** आनंदाची असायला हवी, पण आमच्यावरच्या मोठ्या संकटाचं स्वरूप असं आहे कीं, अशा लहानशा आनंदावरही विरजण पडावं.

**उर्मिला :** म्हणजे ? समजलें नाहीं मी.

**बाबासाहेब :** मंजू म्हणते माझी आई कां आली नाहीं माझ्या वाढादिवसासाठीं ? ती आली नाहीं तर माझा वाढदिवस नाहीं करायचा. आतां तिची आई कुठून आणायची आम्ही ?

**उर्मिला :** खरंच.

**बाबासाहेब :** जानकीची खरी हकीगत अम्ही मंजूला कळूं दिलेली नाहीं. गांवांत कुणालाच कळूं दिलेली नाहीं. जानकीचे मामा आजारी आहेत त्यांच्याकडे ती गेली आहे असं आम्ही सगळ्यांना सांगतों आहों. मंजूची पण तशीच समजूत आहे. मंजू तिला दर आठवड्याला पत्र देखील लिहिते. मध्येंच एखादे वेळीं जानकीकडून आलेलं खोटं पत्रहि आम्ही मंजूला देतों.

**उर्मिला :** किती केविलवाणी फसवणूक आहे ही !

**बाबासाहेब :** पण अशा फसवणुकीवांचून दुसरा कांहीं मार्ग आहे का आम्हांला ? सांग.

**उर्मिला :** हो, तेंही खरंच.

**बाबासाहेब :** गेल्या चार पत्रांत मंजूनं जानकीला लिहिलं आहे कीं, माझ्या वाढदिवसासाठीं तुला आलंच पाहिजे. जानकीचं खोटं उत्तरही आम्ही आणवलं, कीं शक्य तों मी येईन, पण मामांना बरं वाटलं तरच मी येईन. मंजूनं हट्ट घेतला कीं एक दिवसासाठीं तरी येऊन जा अशी आईला तार करा. आम्ही तिच्या समाधानासाठीं तेंही सोंग केलं. पण वाढदिवसाचा दिवस आज प्रत्यक्ष आला. आमचं सोंग कसं टिकायचं ? लपंडाव संपवायचा तरी कसा ? तूं आलीस हें फार बरं झालं. तूं तिची समजूत घातलीस तर तिला पटेल. तुझ्यावर फार जीव आहे तिचा.

**उर्मिला :** कुठें, आहे कुठें स्वारी ?

**बाबासाहेब :** तिच्या शाळेंत आज बक्षिससमारंभ आहे तिकडे गेली असेल. ड्रायव्हरला तिनं काल बजावलं होतं, सकाळीं लवकर गाडी तयार हवी म्हणून.

**उर्मिला :** आणि बाकीची मंडळी कुठें आहेत ?

**बाबासाहेब :** राघव आणि लक्ष्मण ना ? ( तितक्यांत तुलसी येतो ) तुलसी, राघव आणि लक्ष्मण घरांत आहेत काय रे ?

**तुलसी :** न्हाईत, बागंत गेल्यात. मंजूच्या वाढदिवसासाठीं सांजची तिच्या सोबतिनीनला मेजवानी हाय ना. तवा ताजी ताजी फळं आनाया गेल्यात. रागव पेढं बरफी मिठाई आननार हाये येतानं.

**बाबासाहेब :** ( उर्मिलेकडे पाहून ) मग आतां कसं करतेस ? आपल्या बागेंत टेलिफोन नाहीं. तुलसीला पाठवूं कां सांगायला तूं आली आहेस म्हणून ?

**उर्मिला :** ( हंसून ) नको नको. त्या दोघांना यायला उशीर झाला तरी चालेल. धीर निघेल मला.

**बाबासाहेब :** मग हरकत नाहीं. तंवर तुझा चहा वगैरे आटप. अरे तुलसी, उर्मिलेला चहा—

**तुलसी :** आदन तयार हाये. पर म्हटलं ती आंत येऊन चा पिनार का भाइर आनावा.

**उर्मिला :** इथें बाहेर दिवाणखान्यांत आण. ( बाबासाहेबांकडे पाहून ) मी तोंड धुऊन येते हं.

**बाबासाहेब :** मी घेणार नाहीं चहा. बाहेर कचेरींत दिवाणजी येऊन बसले असतील. मला जायला हवं, तुला कांहीं हें घर परकं नाहीं. तुलसी, उर्मिलेची सरबराई—

**तुलसी :** अवो बगा तरी. ताटांतला घास हात न लावतां तोंडांत पडलं उरंबिलाताईच्या.

**बाबासाहेब :** ठीक. ( ते बाहेर जातात. )

[ भिंतीवर जानकीचा फोटो असतो त्याकडे पहात उर्मिला उभी राहते. तुलसीही फोटोकडे पहात तिच्या मागें उभा राहतो. ]

**उर्मिला :** ( बराच वेळ पाहिल्यानंतर उसासा टाकून ) जानकी, कुठें आहेस तूं ? तुलसी, कुठें असेल रे ही माझी मैत्रीण ? किती ममता तिची माझ्यावर.

**तुलसी :** आतां मला सांगातिस व्हय ! मी उलटा तुमची चेंद करायचा, सोबातिनी दोघी गळ्यांत गळा पर जावा झाल्या कीं कांद्याचा मळा !

**उर्मिला :** माझ्याशीं भांडायसाठीं तरी येऊं दे रे जानकी परत. ( निःश्वास टाकते व आंत जाते. )

[ तुलसी आंत जातो, चहाफराळाचा ट्रे घेऊन येतो. कोचापुढच्या तिपाईवर मांडून ठेवतो आणि साफसुफी करीत दिवाणखान्यांतच राहतो. थोड्या वेळानं उर्मिला परत येते व चहाच्या टेबलापुढें बसते. बाहेरून हांक ऐकूं येते, " तुलसी ! तुलसी ! " ]

**तुलसी :** लक्षिमना आला जनू. दिऊं कां नाजुक वर्दी उरंबिला हितं हाये म्हून ? ( ती हंसते व खुणेनें नको म्हणते... पुन्हा, " तुलसी ! तुलसी ! अरे हे फळांचे करंडे— " असे लक्ष्मणचे उंच आवाजांतले शब्द ऐकूं येतात. ) हां जी आलों आलों ! ( जातो )

[ उर्मिलेचा चेहरा गंभीर होतो. ती पोलक्याच्या खिशांतून एक पत्र बाहेर काढते व घाईनें वाचते. तिच्या कपळाला आंठ्या पडतात. ती तें पत्र पुन्हां झटकन् पोलक्यांत ठेवते. तितक्यांत लक्ष्मण प्रवेश करतो. तो माडीवर जाऊं लागतो, पण तितक्यांत त्याचं लक्ष उर्मिले-कडे जातं व तो थबकून उभा राहतो. ]

**लक्ष्मण :** हें काय ? तूं केव्हां आलीस ?

**उर्मिला :** आनंदानं विचारतो आहेस कां नाराजीनं ?

**लक्ष्मण :** तुला पाहून आनंद होणार नाहीं मला ?

**उर्मिला :** कुणास ठाऊक ! माझं स्वागत तूं कसं करशील याची शंका घेतच मी आलें आहे.

**लक्ष्मण :** सरदार शितोळ्यांच्या घरांत कुणाही पाहुण्याचं स्वागत उत्तमच होईल.

**उर्मिला :** शितोळ्यांच्या घराचा हवाला नको देऊंस. तूं माझं स्वागत कसं करणार आहेस सांग. पण असं आडून बोलणं हवं आहे कशाला ? ( उठून त्याच्या जवळ जाऊन ) तुझं माझ्यावर पूर्वीसारखं प्रेम आहे कीं नाहीं ?

971 7354

(पोलक्यांतून पत्र काढून) हें काय लिहिलंस ? हें पत्र वाचल्याबरोबर धांवत आलें मी. हें काय लिहिलंस ?

**लक्ष्मण :** काय लिहिलं ?

**उर्मिला :** आठवत नाहीं ? ऐक–"अनेक आशीर्वाद–" पूर्वी मला पत्र लिहितांना कोणकोणते मायने लिहीत होतास आठव. का विसरलास ?

**लक्ष्मण :** विसरणं सोपं नाहीं. पण तें आतां मी विसरणार आहें. अन् तूंही विसर.

**उर्मिला :** काय म्हणून ? असं काय घडलं आहे ? हें विचारायलाच मी धांवत आलें आहे. तुला मी नकोशी झालें काय ? सांग. सांग.

**लक्ष्मण :** मी सारं लिहिलं आहे त्या पत्रांत.

**उर्मिला :** काय लिहिलं आहेस ? खुळ्यासारखं लिहिलं आहेस. (पत्र वाचते) "माझ्या राघवदादाची जानकी कधीं परत येईल अशी आशा दिसत नाहीं. दादा दुःखांत असतांना लग्न करून सुखी होण्याची मला शरम वाटते. तुला किती दिवस थांबायला सांगूं मी ? तूं स्वतःच्या लग्नाचा स्वतंत्र विचार करावास हें चांगलं–" चांगलं ! हें काय लिहिणं ?

**लक्ष्मण :** दुसरं काय मी लिहूं शकतों ?

**उर्मिला :** तूं असं लिहायला हवंस, कीं ऊर्मिला, धीर धर, थांब, आज ना उद्यां जानकीचा शोध लागेल, माझा राघवदादा पुन्हा सुखांत दिसेल, मग आपण लग्न करूं.

**लक्ष्मण :** तशी आशा मी सहा महिने धरली. पण आतां–

**उर्मिला :** प्रयत्न संपले ?

**लक्ष्मण :** ते कसे संपतील ? पण उघड प्रयत्न करतां येत नाहींत. आमच्या सरदार घराण्याची अब्रू आड येते आहे. जानकी नाहींशी झाली हें कुणाला सांगतां येत नाहीं. उघड शोध करतां येत नाहीं. थोडीशी आशा वाटली कीं राघव अन् मी दूरदूरच्या गांवीं धांव घेऊन जातों, पण हात हालवीत परत यावं लागतं. पळविल्या गेलेल्या स्त्रियांचा शोध लावण्यासाठीं सरकारनं खातं काढलं

आहे तिथें आम्ही जानकीची हकिकत नोंदवून आलों आहोंत. त्यांच्याकडून कांहीं बातमी येईल म्हणून रोज वाट पाहतों आम्ही. पण मन असं अधू झालं आहे कीं, वाटतं या वाट पाहण्यांत कांहीं अर्थ नाहीं. म्हणून तुला सांगणं भाग आहे, माझा नाद सोड.

**उर्मिला :** असं वेड्यासारखं बोलूं नकोस.

**लक्ष्मण :** मग तुला किती दिवस थांब म्हणूं ?

**उर्मिला :** तेंच तुला सांगायसाठीं मी मुद्दाम आलें.

**लक्ष्मण :** काय सांगणार आहेस ?

**उर्मिला :** ऐक. कल्पांतापर्यंत थांबायची माझी तयारी आहे. फक्त एकच आधार मला हवा.

**लक्ष्मण :** कोणता ?

**उर्मिला :** तुझं माझ्यावरच प्रेम कायम आहे या खात्रीचा. ती खात्री असली तर माझा धीर कधीं संपायचा नाहीं. भावाचं दुःख पाहून तुला स्वतःचं सुख नकोस वाटतं हें पाहून तुझ्यावर माझी प्रीति अधिकच दृढ झाली आहे. मला तूं हवास. तुला मी हवीशी वाटते एवढं सांग म्हणजे मी वाटेल तितकी वाट पाहीन. तुझं माझ्यावर प्रेम आहे ना ? सांग.

**लक्ष्मण :** आहे.

**उर्मिला :** पूर्वीइतकंच ?

**लक्ष्मण :** अंहं ( तिची चर्या बदलते. तो हंसतो. ) जास्त. ( ती हंसते. ) पूर्वीपेक्षां जास्त. ( दोघेही हंसतात. ) किती जास्त सांगूं ? ( तिला जवळ ओढण्यासाठीं तिचा हात धरूं लागतो. )

**उर्मिला :** ( दूर होऊन ) नको नको, तूं न सांगतांच कळलं मला. ( " काका ! काका ! " अशा हाका ऐकूं येतात. )

**लक्ष्मण :** मंजू आली वाटतं शाळेंतून परत. तिला सांगतों तूं आली आहेस म्हणून. ( घाईनें जातो )



शितोळ्यांचा धाकटा मुलगा लक्ष्मण व त्याची प्रेयसी ऊर्मिला



जानकीचा पति राघव आणि मुलगी मंजू

**उर्मिला :** ( कांहीं वेळ लक्ष्मणकडे पहात रहाते, मग स्वतःशींच हंसते. ) पूर्वीपेक्षां जास्त. किती गोड शब्द आहेत हे ! दोन घटकापूर्वी आले तेव्हां छाती शंकेनं धडधडत होती. आतांही धडधडत आहे, पण ती किती निराळ्या मधुर विचारांनीं !

[ तुलसी येतो, व चहा फराळाचं सामान परत नेण्यासाठीं तें उचलूं लागतो. त्याच्या लक्षांत येतं कीं चहा तसाच आहे. तो आश्चर्यानं उर्मिलेकडे पाहतो. ]

**तुलसी :** आं ? काय ह्ये ? चा घेतला न्हाईस ?

**उर्मिला :** ( हंसून ) नाहीं.

**तुलसी :** आं ? अर मग इतका येळ केलसा काय ?

**उर्मिला :** ( जास्त हंसून ) केलं कांहीं तरी.

**तुलसी :** ( तिच्याकडे पहात रहातो. मग लक्षांत आल्याप्रमाणें हंसतो. ) या चाचं थंड मडगं झालंय, दिसरा आनूं का गरमागरम ?

**उर्मिला :** नको !

[ तुलसी जातो, तितक्यांत मंजूला घेऊन लक्ष्मण दारांत उभा रहातो. ]

**लक्ष्मण :** ( मंजूला ) तें पाहिलंस कोण आलं आहे ?

**मंजू :** अय्या ! ( धांवून उर्मिलेला बिलगते. )

**उर्मिला :** ( तिला घट्ट धरून तिचा मुका घेते, पण मग दूर करून तिच्याकडे कौतुकानं पाहते. ) चांगली मोठी दिसूं लागलीस कीं मंजू ?

**मंजू :** मी मोठी झाली आहे कीं लहान राहिलें आहे ते मला आतांशा कळेनासं झालं आहे. वडील माणसांनीं मला बुचकळ्यांत टाकलं आहे.

**उर्मिला :** ( हंसून ) म्हणजे काय ?

**मंजू :** अग ही वडील माणसं काय करतात ( लक्ष्मणकडे बोट दाखवून ) इतरांचं राहूं दे, हा काका काय करतो सांगूं? घटकेंत म्हणतो, मंजू तूं आतां मोठी झाली आहेस, अमूक अमूक करणं तुला शोभत नाहीं, अन् घटकेंत म्हणतो, मंजे, तूं अजून लहान आहेस, अमुक गोष्ट तुला समजायची नाहीं. याच्या सोईप्रमाणें मी

अलटून पालटून मोठी होते, लहान होते. ( उर्मिला मोठ्यांदा हंसते. ) त्यामुळें मला भ्रम पडला आहे कीं. खरं काय? मी मोठी झालें आहे कीं कुकुलं बाळच आहे अजून? आतां तूं तरी सोडव हें माझं कोडं.

**लक्ष्मण :** ( मंजूला ) अग ती सुद्धां अजून कुकुलं बाळच आहे. ती काय सोडवते तुझं कोडं?

**मंजू :** अहाहा ऽऽ! कोडीं सोडवणारा एकटा शहाणा आमचा काका बरं काय! टाइम्समधली कोडी सोडवीत, डोकं खाजवीत बसलेला असतो खरा. बक्षीस मात्र कधीं मिळत नाहीं काकाला.

**लक्ष्मण :** ( उर्मिलला ) एका माणसाला आज शाळेंत बक्षीसं मिळालीं त्याची ऐट आहे बरं का ही.

**उर्मिला :** होय?

**लक्ष्मण :** तिच्या छातीवरचीं पदकं दिसलीं नाहींत वाटतं तुला? बघ कीं कशी बँडवाल्यासारखी दिसते आहे.

**मंजू :** कांकिटल्या म्हणूं कां आतां?

**लक्ष्मण :** म्हटलंस तर लहान ठरशील.

**मंजू :** नाहीं म्हटलं तर मोठी ठरेन?

**लक्ष्मण :** अंहं. माझी बँडवाल्याची उपमा तुला आवडली असं ठरेल.

**मंजू :** कांकिटला.

**उर्मिला :** तुम्ही दोघं नेहमीं अशींच भांडतां कां रे?

**मंजू :** फार भांडखोर आहे हा काका. त्याला बायको सवाई भांडखोर मिळाली पाहिजे.

**उर्मिला :** मिळेल, मिळेल. त्याच्याकडे लक्षच देऊं नको तूं. मला पदकं पाहूं दे तुझीं. कशा कशा बद्दल मिळालीं?

**मंजू :** ( छातीवरच्या एकेका पदकावर बोट ठेवीत ) हें मिळालं पाठ केलेलं भाषण म्हणण्याबद्दल. हें निबंधाबद्दल. हें काव्य गायनाबद्दल.

**उर्मिला :** अन् हें ?

**मंजू :** नाचण्याबद्दल. पण बाबांना सांगायचं नाहीं हं. त्यांना आवडत नाहीं. ते म्हणतात घराण्याच्या लौकिकाला शोभत नाहीं.

**उर्मिला :** मग त्यांना काय सांगायचं ? हें पदक कशाबद्दल ?

**लक्ष्मण :** रामरक्षा म्हणण्याबद्दल. ( सर्व हंसतात. )

**मंजू :** ( उर्मिलेस ) तूं माझं काव्य गायन ऐकायला हवं होतंस. काल कां नाहीं आलीस ? तुला घेऊन गेलें असतें आमच्या शाळेंत.

**लक्ष्मण :** हो ! आम्ही येतों म्हटलं तर नेलंस का ?

**मंजू :** पुरुषांना परवानगी नाहीं—आमच्या शाळेंत.

**लक्ष्मण :** काकालासुद्धां ?

**मंजू :** काका म्हणजे पुरुष नाहीं वाटतं ? आमच्या शाळेचा नियम आहे.

**लक्ष्मण :** शाळेचा नियम आहे, पण मुली पुढें काय करतील याचा कांहीं नियम आहे कां ?

**उर्मिला :** तूं त्याच्याशीं बोलूं नकोस. माझ्याशीं बोल.

**मंजू :** तूं काल कां नाहीं आलीस ? तुला माझं काव्यगायन फार आवडलं असतं.

**लक्ष्मण :** आतां ऐकवायला काय हरकत आहे ? ( मंजू त्याच्याकडे टवकारून पाहते. ) मी स्वगत भाषण करतों आहे.

**उर्मिला :** खरंच मंजू, आतां ऐकवायला काय हरकत आहे ? म्हण कीं.

**मंजू :** अंहं.

**उर्मिला :** अंहं काय ? म्हण.

**मंजू :** आत्तां नको.

**उर्मिला :** मग केव्हां ?

**लक्ष्मण :** संध्याकाळीं तिला म्हणायला लावूं आपण. तिच्या वाढदिवसासाठीं तिच्या कांहीं मैत्रिणींना बोलावलं आहे आम्हीं संध्याकाळीं त्या वेळेस. ( उर्मिलेकडे पाहून ) तोंपर्यंत धीर धर.

**उर्मिला :** तूं नेहमीं धीर धरायलाच सांगणार, मला माहीत आहे. ( मंजूला ) मंजू आत्तांच म्हण ग.

**मंजू :** आत्तां नको.

**उर्मिला :** मग संध्याकाळच्या पार्टीत तरी खास म्हणशील ?

**मंजू :** पार्टी झाली तर म्हणेन.

**लक्ष्मण :** झाली तर म्हणजे काय ? होणारच. तुझ्या मैत्रिणी येणार आहेत, मी फळं घेऊन आलों आहे, राघव मिठाई घेऊन येणार आहे. अनायासे उर्मिलाही आली आहे.

**उर्मिला :** मी तुला एक सुंदर साडी घेऊन आलें आहे.

**लक्ष्मण :** आम्ही सगळी तयारी केली आहे.

**मंजू :** पण एक मोठी उणीव राहिली आहे. माझी आई अजून आली नाहीं. माझ्या प्रत्येक वाढदिवसाला आईनें किती हौसेनं साऱ्या गोष्टी केल्या. तिच्या-वांचून माझा वाढदिवस कसा साजरा होणार ? मला त्यांत मजा कशी वाटणार ? मी तिला प्रत्येक पत्रांत लिहिलं आहे कीं, एका दिवसासाठीं तरी तुला आलं पाहिजे. आली नाहींस तर मी तुझ्यावर फार रागावेन. काल माझ्या स्वप्नांत ती आली अन् म्हणाली, मंजू मी आलें आहे. सकाळीं मी उठल्याबरोबर बाबांना विचारलं-बाबा, आई आली आहे होय ? शाळेंतून परत आल्यावरही आधीं विचारलं, आई आली आहे ? पण—

[ दाराबाहेरच्या ओटीवरून राघव ओरडतो, " मंजू ! मंजू ! तुझी आई येते आहे ! " सगळीं चकीत व आनंदित होतात. राघव पुन्हा ओरडतो, " तार आली ! " ]

**राघव :** ( प्रवेश करून ) लक्ष्मणा, तुझी वहिनी येते आहे ! ( त्याच्या हातीं तार देतो. तो ती वाचतो व हळूंच उर्मिलेकडे देतो. ) आं ? तूं केव्हा आलीस ?

**उर्मिला :** सकाळींच.

**राघव :** फार आनंदाची गोष्ट. हा आनंद पोटांत मावत नाहीं माझ्या. मिठाई आणली आहे ती सारी वाटून टाक तुलसी. मंजूच्या पार्टीसाठीं पुन्हा दुप्पट आणूं. ( मंजूला ओढून पोटाशीं धरून ) आतां तुझा वाढदिवस करायचा ना ?

**मंजू :** करायचा, करायचा ! अगदीं थाटांत करायचा ! केव्हां येणार आई ? ( उर्मिलेला ) बघूं तार.

**राघव :** ( तार मंजूकडे देऊं नकोस म्हणून उर्मिलेला डोळ्यानं खुणावतो व ती स्वतः घेतो. ) अग तारेसारखी तार. ऐक. ( वाचतो ) ' मंजूला सांगा सकाळच्या गाडीनं येतें. ( मंजू तारेचा कागद ओढून घेते. ) अग अग फाडशील.

**मंजू :** फाडीन कशी ? ( कागदाची घडी करते व पटापट तिचे मुके घेऊन परत देते. ) घ्या. आई येणार ! ती मला स्वप्नांत म्हणाली ते खोटं नाहीं. आई येणार ! ( बाबासाहेब प्रवेश करतात. त्यांच्याकडे धांवते ) बाबा आई येणार ! तिची तार आली ! ती बघा ! ( राघवला ) सकाळच्या गाडीनं येणार म्हणजे केव्हां ?

**राघव :** आत्तांच. वेळ झालीच आहे.

**मंजू :** ( उर्मिलेला ) तूं मला साडी आणली आहेस ना ? नेसवतेस चांगली ? मला नीट नेसतां येत नाहीं. आईला वाटलं पाहिजे केवढी मोठी झाली मंजू ! नेसवतेस ! अं ?

**उर्मिला :** हो हो चल. ( तिला घेऊन घाईनं माडीवर जाते. त्या दोघी गेल्यावर राघव,लक्ष्मण व बाबासाहेब गंभीर होतात. )

**बाबासाहेब :** कुणाची तार आहे ?

**राघव :** सरकारी खात्यांतल्या माझ्या मित्राची.

**बाबासाहेब :** काय लिहिलं आहे ?

**राघव :** ( हळूं आवाजांत ) " तुमची बायको जानकी सांपडली आहे. तिला घेऊन उद्यां सकाळीं येतों. "

**बाबासाहेब :** कुठें सांपडली ?

**राघव :** तारेंत कसं लिहिणार सारं ?

**लक्ष्मण :** ( जरा रागानें ) कुठें, केव्हां, कशी, हे प्रश्न महत्वाचे आहेत कां ? सांपडली येवढा एकच शब्द आपल्या आनंदाला पुरेसा नाहीं काय ?

**बाबासाहेब :** तें खरं आहे रे, पण आपलं मनांत येतं—

**लक्ष्मण** : कांहीं येत नाहीं मनांत.

**राघव** : जानकी आल्यावर तूं कुठें होतीस, कशी होतीस असले प्रश्न तिला कोणी करतां कामा नये. आधींच ती दुःखानं गांजून गेलेली असेल. तिला पूर्ण विश्रांती कशी मिळेल हा एकच विचार सगळ्यांनीं केला पाहिजे. घरांत जिकडे तिकडे आनंद, हास्य, उल्हास तिला दिसला पाहिजे.

**बाबासाहेब** : अरे तो काय खोटा कां दाखवायचा आहे ? झालाच आहे आपल्याला. तुलसी माझा अंगरखा पगडी घेऊन ये. तयार राहतों जानकीच्या स्वागताला. राघवा तुझं लग्न झालं तेव्हां सुनमुख पाहिलं, पण आतां पुन्हा सुनमुख पाहण्याचा समारंभच होणार आहेसं मला वाटतंय्. ( तुलसी अंगरखा, पगडी आणून देतो, तो घालतां घालतां ) तुलसी तूं सुद्धां तुझा मंझील बांध. फुलं गोळा करून ठेव. जानकीच्या पायांवर ओतायसाठीं दुधाचा तांब्या लागेल. उर्मिलेला म्हणावं जानकीला ओवाळण्यासाठीं पंचारती तयार कर. दृष्ट काढायसाठीं नारळ तयार ठेवा. दाराला आंब्याचं तोरण लावा. ( लक्ष्मणाला ) अरे, उभा काय राहिलास ? वरच्या गॅलरींत खूप मोठी गुढी उभी कर! ( लक्ष्मण जातो ) तुलसी, अंगणांत सडा शिंपायला सांग. रांगोळ्या घाला म्हणावं. चंदन जाळून जिकडे तिकडे घमघमाट करून टाका. राघवाची आई आज असती तर तिनं जें जें केलं असतं तें कर. पळ पळ तुलसी ! ( तुलसी जातो. ) जानकी येईल आतां. मी बाहेर जाऊन उभा राहतों वाट बघत. ( जातात )

**राघव** : ज्या आनंदाच्या क्षणाची इतके दिवस वाट पाहिली तो आज आला. ( घाईनं माडीवर जातो. )

[ तुलसीची व इतर नोकरांची धांदल चालू होते. एक जळत्या चंदनाची थाळी आणतो. दुसरा फुलं आणून ठेवतो. तिसरा निरांजनं लावलेलं तबक वगैरे सामान आणून ठेवतो. तुलसी एकदोनदां माडीवर जाऊन येतो. मग तो बाहेर जातो. लक्ष्मण माडीवरून खाली येतो व तुलसीनं केलेल्या व्यवस्थेवर नजर टाकतो. मग राघवही येतो. ]

**तुलसी** : ( प्रवेश करून ) राघव ! लक्षिमना ! चला चला. कोंपऱ्यावरच्या वळनानं एक मोटार इकडच्याच रस्त्यावर येतिया.

**राघव-लक्ष्मण :** होय ?

**तुलसी :** व्हय न्हवं ? अवो आमची जानकीच. दिसरं कोन येनार ? येनार म्हंजी येनार ! ( धांवत बाहेर जातो. )

**राघव :** जानकीच आली असणार. ( जातो. )

**लक्ष्मण :** ( बाहर जातांना जिन्याशीं थांबून ) उर्मिले, लवकर खालीं या. मंजू, तुझी आई आली. ( त्या दोघी लगबगीनं जिन्यांत येतात. ) ओ हो ! मंजू तूंच कां ही ? मला वाटलं—

**मंजू :** ( खालीं त्याच्याजवळ येऊन ) काय वाटलं तुला ?

**लक्ष्मण :** एखादी चित्रपट तारका स्वर्ग-सोपानावरून खालीं पृथ्वीवर उतरत आहे.

**मंजू :** काकिटल्या, बघ हं. ( हात उगारते. )

[ बाहेर हॉर्न वाजतो. तुलसी धांवत येतो. ]

**उर्मिला :** अगबाई, आलीच कीं जानकी, पंचारती कुठें आहे ?

**मंजू :** ( तिला ओढून ) चल चल, फुलं कुठें आहेत ?

**तुलसी :** ह्याः ! भाइर जायचं न्हाई आतां उरांबिला. आर, त्ये आरतीचं तबक घे, मंजा ! अग तीं फुलं बगत्यात न्हवं कां डोळं वटारून आम्हांस्नी घ्या म्हून. उचला, उचला. रागव आत्तां ईल जानकीला घिऊन. ईल म्हंजी काय, आलाच. वसाड तोंडाचं नशीब आतां लागलंय हंसाया. ( त्या दोघी त्याप्रमाणें करतात. बाबासाहेब, राघव आणि जानकी दारापाशीं येतात. )

**बाबासाहेब :** सूनबाई, थांब जरा. आंत पाऊल टाकूं नको. उर्मिला तुला ओवाळील. तुझी दृष्ट काढील, मग घरांत प्रवेश कर. तुलसी नारळ ओवाळून टाक सूनबाईवरून.

[ तुलसी नारळ ओंवाळून फोडतो. त्यांतलं पाणी जानकी-राघवाच्या डोक्यावर आणि मग इतर मंडळींच्या अंगावर शिंपडतो, दुधाचा तांब्या जानकीच्या पायावर ओततो. उर्मिला जानकीला ओवाळते. मंजू

फुलं उधळते. हें सर्व चालूं असतांना योग्य पार्श्वसंगीत चालूं असतं. जानकी आंत पाऊल टाकते. ]

**मंजू :** ( हातांतलं तबक तुलसी जवळ देते व जानकीकडे धांवून तिला मिठी मारते. ) आई ! आई !

**जानकी :** ( तिचे मुके घेते व मग तिला दूर धरते. ) मंजू! मंजू! ( हंसते तिला जवळ ओढून घेऊन आवळते आणि मग एकदम हुंदके देऊं लागते. ) मंजू ! मंजू ! ( तें पाहून सारीजणं डोळे पुसतात. )

**मंजू :** ( गोंधळून जाऊन ) आई ! आई ! असं काय करतेस आई !

**जानकी :** आई ! तू खरंच कां मला हांक मारलीस ? कां मला नेहमीसारखा भास होतो आहे ? ( तिला चांचपून पाहाते ) तूं खरंच माझ्या मिठींत आहेस ? तुझे हे लुसलुशीत हात, तुझं हें गोड तोंड, तूं खरंच आहेस माझ्याजवळ ? मी तुझी आई राहिलें आहे अजून ? कांहीं बदल नाहीं दिसत तुला माझ्यांत ?

**मंजू :** ( भांबावून ) असं काय विचारतेस आई ? हा तुझाच आवाज, हा तुझाच स्पर्श. अंधारांत सुद्धां मी तुला ओळखीन. पण आतां तूं विचारलंसं म्हणून मी तुझ्याकडे निरखून पाहातें तेव्हां मात्र माझं मन गोंधळून जातं. तूं मला निराळी दिसतेस. तुझ्या अंगावर एकही दागिना कसा नाहीं ? पातळ असलं कां नसली आहेस ? तुझं तोंड असं कां थकलेलं, सुकलेलं ? आई मामा आजारी होते ना ? कां तूंच आजारी होतीस ? तुला प्रवासाचा फार शीण झाला काय ? माझ्या वाढदिवसाला यायला हवं असा मी उगीच हट्ट धरला. तूं रागावली नाहींस ना माझ्यावर ? आई, बोल ना !

**उर्मिला :** ( जवळ जाऊन ) मंजू, तुझी आई प्रवासानं थकली आहे. तिला आधीं विश्रांति घेऊं दे. ( मंजूला दूर करून राघवाच्या स्वाधीन करते व जानकीला प्रेमानं धरते. ) जानकी, इकडे ये. आपण कोचावर बसूं. ( तिच्यासह कोचावर बसते. )

**जानकी :** ( तिला चांचपून ) तूं उर्मिला ?

**उर्मिला :** होय ग—

**जानकी :** खरंच वाटत नाहीं ! किती शांत निर्वेध आहे इथें ! माझं घरच ना हें ? इथें आलें या गोष्टींवर विश्वास बसत नाहीं. स्वर्गात आल्यागत वाटतं. पण पुन्हां वाटतं हा भास आहे. दुःखाच्या वणव्यांतून बाहेर पडलें हें खरं वाटत नाहीं. सुखाच्या सावलींत आलें. पण वाटतं खरंच आलें कां ? मी जिवंत तरी खरंच आहे कां ? असा भ्रम वाटतो. कारण–( एकदम हुंदके देऊं लागते ) कारण फार दिवस मी वनवासांत राहिलें ग ! ( तोंड लपवून गदगदून रडते. )

**मंजू :** ( एकदम धांवून जानकीला मिठी मारून ) आई ! आई ! ( सगळ्यांकडे पाहून ) ही असं कां करते आहे ? सांगा ! अरे काका, माझी आई असं कां करते ? सांग रे.

**राघव :** ( तिच्या जवळ जाऊन ) मंजू तूं वेडी का ? ( जानकीला ) जानकी, तूं खरंच घरीं आली आहेस. हा भास नाहीं. बघ. तुझी भेदरलेली दृष्टि टाक आणि नीट बघ. तो बघ आपला तुलसी. ज्यांनीं तुझ्यावर सदा ममता केली ते बघ बाबा. जी तुझ्या कौतुकाचा चारा खाऊन वाढली ती बघ तुझी लाडकी मंजू. ही तुझी जिवाभावाची मैत्रिण उर्मिला. ज्याचं तुझ्यावर सख्या भावाहूनहि अधिक प्रेम तो हा तुझा दीर लक्ष्मण. अन् " माझी जानकी पाहिलीत का " असं ज्याला त्याला–आभाळांतल्या पाखरांना सुद्धां जो वेड्यासारखा विचारीत सुटला होता तो मी तुझा राघव !

**जानकी :** (सगळ्यांकडे न्याहाळून पाहते. किंचित् हंसते.) खरं आहे. (लक्ष्मणकडे पाहून ) माझा लक्ष्मणच हा.

**लक्ष्मण :** ( पुढें होऊन ) वहिनी ! ( ती त्याचा हात धरते. )

**जानकी :** ( राघवकडे पाहून ) होय. माझे राघवच तुम्ही.

**राघव :** जानकी ! ( ती त्याचा हात घट्ट धरते. हंसते, पण लगेच तिची चर्या बदलते. कांहींशा रागानं, कांहींशा शंकेनं, दुःखानं ती त्या दोघांकडे आळीपाळीनें पाहते. तिचे ओंठ थरथर कांपतात. ती एकदम मोठ्या आवाजांत म्हणते— " पण–पण " ) जानकी, असं काय करतेस ?

**जानकी :** ( लक्ष्मणकडे पाहून ) पण तूं एवढा माझा पाठीराखा दीर, ऐन वेळीं कुठें नाहींसा झाला होतास ? 'लक्ष्मणा, धांव' अशी किंकाळी मीं फोडली ती

तुला ऐकायला आली नाहीं ? ( राघवकडे बघून ) तुम्ही माझे जन्माचे सोबती. संकटानं मला घेरलं आणि मीं हंबरडा फोडला तेव्हां तुम्ही धांवून कसे आला नाहीं ? माझे दादा मारले गेले, घर पेटलं, लांडग्यांच्या हातीं मी सांपडलें तेव्हां मी टाहो फोडला तो तुम्हांला ऐकूं आला नाहीं ? लक्ष्मण, तुम्ही बाबासाहेब, सारेजण कुठें होतात ? खुशाल मला वनवासी होऊं दिलंत ? कुठें होतां ? अहो, कुठें होतां ? ( वात झाल्याप्रमाणें हातवारे करते, मग मोठ्यांदा रडूं लागते. त्या दोघांचे हात झटकून टाकते आणि कोचाच्या पाठीवर मान टेकते. )

**मंजू :** ( केविलवाणा स्वर काढून ) आई !

**राघव :** लक्ष्मण, डॉक्टरना घेऊन ये ताबड़तोब. नाहींतर टलिफोन कर. म्हणाव असाल तसे निघून या. उर्मिला, हिला आपण हलकेच खोलीकडे नेऊं या. रडतेस काय वेड्यासारखी ? धीर धर. बरं वाटेल तिला. धर तिचा हात. अलगद नेऊं या तिला. ( तीं दोघें वांकतात. "हॅलो डॉक्टर ! डॉक्टर ! हॅलो ! डॉक्टर ! डॉक्टर" असा लक्ष्मणचा फोनवरचा आवाज ऐकूं येतो. त्यांतच उर्मिलचे हुंदके आणि "रडतेस काय बरं ?" असे राघवाचे शब्द मिसळतात. )

# २

[ सरदार शितोळयांच्या वाड्यांतील दिवाणखाना. पडदा वर जातो तेव्हां दिवाणखान्यांत कोणी नसतं. ओटीवर वाजंत्री वाजत असतात. ती ऐकूं येतात. तुलसी आणि इतर एक दोघे नोकर घाईनं येरझारा घालतांना दिसतात. थोड्या वेळानं मंजू आंतल्या दालनांतून दिवाणखान्यांत येते व जिन्याच्या पायथ्याशीं जाऊन हांका मारते. ]

**मंजू :** काका ! ए काका ! काका ऽऽ !

**लक्ष्मण :** ( आपल्या खोलींतून बाहेर येऊन वरच्या पायरीवरच उभं राहून ) काय ग ? केवढ्यांदा ओरडतेस ?

**मंजू :** ओरडूं नको तर काय करूं ? तूं नेहमीं दार लावून बसतोस—

**लक्ष्मण :** कोण मी ?

**मंजू :** तूं एकटा नव्हे, तूं अन् तुझी बायको.

**लक्ष्मण :** चल ! माझ्या खोलीचं दार सताड उघडं आहे. येऊन बघ वाटलं तर. ( खालीं उतरतो )

**मंजू :** म्हणजे, काकू तुझ्या खोलींत नाहीं ? मग आहे कुठें ती ?

**लक्ष्मण :** मला काय माहीत ! असेल खालींच कुठेंतरी. बघ.

**मंजू :** ( जिन्यापासून दूर होऊन इकडे तिकडे पाहून ) काकू ! ए काकू !

**उर्मिला :** ( प्रवेश करून ) मंजू! आतां मार देऊं का तुला ? मला काकू म्हणत जाऊं नकोस म्हणून कितीदां सांगितलं तुला तरी—

**मंजू :** अग पण दुसरं काय म्हणूं तुला ?

**उर्मिला :** वाटेल तें म्हण, पण काकू नको. मला लाज वाटते.

**मंजू :** मग माझ्या काकाची बायको झालीस कशाला ?

**लक्ष्मण :** बरोबर आहे. लग्न झाल्यावर आपल्याला कोण काय म्हणेल याचा विचार माणसानं आधीं नको करायला ? तुम्हां शिकलेल्या मुलींची मोठी गंमत आहे बुवा. लग्नाच्या आधीं मारे अशी ऐट आणायची कीं कुणी काय वाटेल तें म्हटलं तरी चालेल, अन् लग्न झाल्यावर मात्र तक्रारी काढायच्या, मला काकूच म्हणूं नकोस, मला मावशीच म्हणूं नकोस. तूं अशी चिडखोरपणा करायला लागलीस तर मी सुद्धां तुला काकू म्हणून हांक मारायला लागेन.

**उर्मिला :** तुम्ही आपल्या पुतणीचाच कैवार घेणार मला माहीत आहे. बरं बाई मंजू, तूं मला काकूच नाहीं तर आजी सुद्धां म्हण हं वाटलं तर.

**मंजू :** आजी होशील तेव्हां आजी म्हणेन. सध्यां फक्त काकूच आहेस, तेव्हां काकूच म्हणेन.

**उर्मिला :** बरं बाई म्हण. कां हांका मारीत होतीस ?

**मंजू :** आईनं तुम्हाला दोघांना सांगितलं आहे, कीं कपडे करून लवकर तयार व्हा.

**लक्ष्मण :** मी तर कपडे करून तयार आहे.

**जानकी :** ( आंतल्या दालनांतून दिवाणखान्यांत येतां येतां ) वा ! अशा पोशाखानं येऊन कसं चालेल ? कुणाकडे चहा फराळाला जायचं आहे अशी समजूत आहे कीं काय ?

**लक्ष्मण :** तशी कशी समजूत असेल ? तुम्ही मला काल बजावलं तें लक्षांत आहे माझ्या. लग्न झाल्यानंतर पहिल्या पौर्णिमेच्या दिवशी मल्हारीच्या दर्शनाला जोडप्यानं जाऊन पूजा बांधण्याचा शितोळ्यांच्या घराण्याचा कुलाचार आहे. त्याप्रमाणें मला आणि उर्मिलेला जायचं आहे हें माहीत आहे मला.

**जानकी :** मग माहीत असून असा येणार तूं ? असं चालायचं नाहीं. दागिने घातले पाहिजेत.

**लक्ष्मण :** वहिनी, खरं सांगूं ? दागिन्याचा आणि समारंभाचा मला आतां कंटाळा आला आहे. आमचं लग्न होऊन पंधरा दिवस होत आले तरी यांतून सुटका होत नाहीं. बायको दाखवायसाठीं किती नातलगांकडे आणि स्नेह्यांकडे गेलों त्याला कांहीं गणती ? किती देवांच्या पाया पडायला गेलो त्याला कांहीं सुमार ? लोकांच्या नव्या बायका पाहायसाठीं माणसांप्रमाणेंच हे देव देखील टपलेले असावेत हें आश्चर्य आहे. वहिनी, तुमचं लग्न झालं तेव्हां राघवदादा तुमचं प्रदर्शन करीत असाच हिंडला होता का ?

**जानकी :** ते आले, ते सांगतील तुला.

**राघव :** ( प्रवेश करून ) याच्या दसपट हिंडावं लागलं होतं आम्हाला. तुझं आणि उर्मिलेचं लग्न पुष्कळच आधुनिक तऱ्हेनं बाबांनीं होऊं दिलं. तुम्ही दोघं दुर्दैवी खरींच.

**उर्मिला :** दुर्दैवी ? तीं कशी ?

**राघव :** अग दुर्दैवी नाहीं तर काय ? जुन्या थाटाच्या लग्नांतल्या कितीतरी गोड गमतींना तुम्ही दोघं मुकलांत.

**लक्ष्मण :** कोणच्या ?

**राघव :** अरे एक का दोन म्हणून सागूं ? स्नान करतांना तुम्ही एकमेकांच्या अंगावर चुळा टाकल्यात ? का सुपाऱ्या लपवल्यात ? का विड्या तोडल्यात ? का उखाण्यासकट नांवं घेतलींत ? का पंक्तींत एकमेकांना घास दिलेत ? काय केलंत काय ? लक्ष्मण, तूं कांहीं म्हण, जुन्या तऱ्हेच्या लग्नांत जी मौज होती ती सुधारणेच्या नांवाखालीं पार गेली ! बाबासाहेबांनीं तुमचे दोघांचे हट्ट ऐकले याचंच मला नवल वाटलं.

**लक्ष्मण :** बाबांनीं ऐकलं पण या वहिनी कुठें ऐकताहेत ? आज दहा दिवस झाले, या रोज आम्हाला दोघांना कुणातरी म्हाताऱ्या नातलगाच्या किंवा देवाच्या पाया पडायला नेताहेत. आमची वरात अजून संपलीच नाहीं. देवक

ठेवण्याच्या वेळेस जीं वाजंत्री सुरूं झालीं तीं अजून दाराशीं वाजताहेत. तीं केव्हां बंद होतील असं झालंय मला.

**जानकी :** असं अशुभ बोलूं नये. सगळे कुळाचार व्यवस्थित व्हायला नकोत काय ?

**लक्ष्मण :** आजचं हें पुनवेचं मल्हारीचं दर्शन तरी शेवटचंच ना ? कां आणखी एखादा देव राहिला आहे ?

**जानकी :** नाहीं. मग लग्ननिमित्त गोंधळ तेवढा घालायचा.

**राघव :** त्याची नको काळजी. हा लक्ष्मण आणि ही उर्मिला घालतील हवा तेवढा गोंधळ.

**जानकी :** तो गोंधळ या घरांत खपायचा नाहीं. लक्ष्मण आतां सासुरवाडीला जाईल. तिकडे घालूं देत हीं दोघं वाटेल तो गोंधळ.

**लक्ष्मण :** वा वहिनी, आम्हाला दोघांना इतक्यांत कंटाळलात ? आणि उर्मिलेच्या घरीं मी एकटा जाईन अशी तुमची कल्पना आहे कीं काय ? तुम्हाला बरोबर घेतल्याशिवाय मी जाईन होय ?

**जानकी :** तें भांडण नंतर करूं आपण. आतां आधीं माझं ऐका पाहूं. तुम्ही दोघं आंत चला, दागिने घाला. उर्मिलेची ओटी भरण्याची सारी तयारी मी देवघरांत करून ठेवली आहे. चला पाहूं.

[ लक्ष्मण, उर्मिला आणि जानकी आंतल्या दालनांत जातात. बाहेर वाजंत्री पुन्हां वाजूं लागतात. तुलसी प्रवेश करतो. ]

**तुलसी :** मंजू ! ए मंजाक्का, अग तुझा काका न् काकू करत्यात तरी काय ? मोटारगाडी कवाधरून कमानी खालीं उभी ऱ्हायलीया. वाजंत्री बिजंत्री समदं तयार आहे. आपल्या रस्त्याच्या दुतर्फाच्या घरावरांतल्या बाया ग्यालरींत येऊन नवरानवरी पाहायसाठीं कवाच्या उभ्या ऱ्हायल्यात. आवरा आवरा बिगी बिगी. चल बस गाडींत.

**मंजू :** अरे पण काकाचं अन् काकूचं अजून आटपायचं आहे. मी एकटीच जाऊन बसून काय करूं ? मी काय नवरी थोडीच आहे ?

**तुलसी :** अग आज नाहीं पन पांच वर्षांनीं होशीलच कीं.

**मंजू :** चल कांहीं तरी बोलूं नकोस. मला लग्नच करायचं नाहीं.

**तुलसी :** अग न्हानपनी समद्याच पोरी असं बोलतात, ठाव हाय मला. चल आटप. मुकाट्यानं गाडींत बस. आवर आवर !

**मंजू :** ( राघवकडे पाहून ) बघा. लग्न झालंय् काकाचं अन् लगिनघाई उडालीय तुलसीची.

**राघव :** उडाली आहे खरीच. आज पंधरा दिवस आनंदानं नाचतो आहे नुसता.

**तुलसी :** नाचूं नगं तर काय करूं ? सांग. घरांत समदीकडं आनंद कसा भरून चाललाय. जानकी परत आली. तिच्या तब्येतीला आराम पडला. उरंबिला तिची धाकली जाऊ म्हून घरांत आली. घरावर पसरलेली काजळी जाऊनशान समदीकडं लख्ख पुनवेचं चांदनं पडलं ! तुला अन् लक्षिमनाला न्हानपनीं म्या कडं खांद्यावर खेळवलं. तुमचं हें सुख पाहुनशान मला कसं आनंदानं नाचावसं वाटत असल त्ये तुला काय सांगूं ? आतां देवाजवळ एकच माग, या मंजाक्काला एक भाऊ होवा, नी हिच्या लग्नाचं लाडू–

**मंजू :** आलास का पुन्हां तूं लाडवावर ? मी तुला एकदां सांगितलं ना मला लग्न करायचं नाहीं म्हणून.

**तुलसी :** अशा सांगनाऱ्या लई बघितल्यात. लग्नावांचून किती दिस राहशील तें बघिनच कीं. तुझं लगीन न्हाई झालं तर नांव बदलीन.

**मंजू :** ( त्याच्याजवळ जाऊन कमरेभोंवती विळखा घालून ) नको नको रे बाबा. तुझं तुलसी हें नांव फार गोड आहे. तें बदलायची पाळी तुझ्यावर आणण्यापेक्षां मी आपली आनंदानं लग्नाला तयार होईन.

**तुलसी :** हां, आतां कसं लाक बोललीस. चल, बस बगूं गाडीमंदी आतां. ( तिला धरून बाहेर घेऊन जातो. )

[ पुन्हां वाजंत्री वाजतात. आंतून जानकी, लक्ष्मण आणि उर्मिला येतात. ]

**लक्ष्मण :** दादा, वहिनींच्या इच्छेला मी कधीं विरोध करणार नाहीं. पण कधीं कधीं त्यांच्या वागण्याचं मला नवल वाटतं.

**जानकी** : वाटूं दे नवल. पण कांहीं गोष्टी व्हायच्या तशा झाल्या पाहिजेत.

**लक्ष्मण** : पाहिलंस दादा.

**राघव** : कशाबद्दल चालला आहे हा वाद ?

**लक्ष्मण** : अरे, माझ्या आणखी उर्मिलेच्या वस्त्रांची गांठ मारण्याची कांहीं जरूरी आहे ? पूर्वी नवऱ्याच्या पाठीमागून चार फुटांवर नवरी चालत असे– तेव्हां गांठ मारीत होते तें ठीक होतें. पण आतां आम्हीं दोघं हातांत हात घालून हिंडायला लागलों तरी ही गांठ हवीच ?

**जानकी** : हें बघ लक्ष्मण, तूं कितीही वाद घातलास तरी मी ऐकणार नाहीं. तुम्ही दोघं मल्हारीच्या पाया पडायला निघालांत तेव्हां ठरलेल्या चालीरीती पाळल्याच पाहिजेत. तुम्ही सिनेमाला निघालात तर मी गांठ मारा म्हणतें काय ?

**राघव** : आणखी गांठ मारली तर तुला लाज कसली वाटते त्यांत ?

**लक्ष्मण** : अरे लाज नाहीं, एक सोडून दहा गांठी मारा. पण गांटीची जरूरी काय म्हणतों मी ?

**जानकी** : तुमची दोघांची जन्मगांठ पडली आहे त्याची खूण पटली पाहिजे ना मल्हारीला.

**राघव** : तुम्हाला दोघांना पाहिल्याबरोबर मल्हारीला समजायला नको काय तुम्हीं दोघं नवराबायको आहांत म्हणून ?

**लक्ष्मण** : असं असं. ही गांठ म्हणजे इंट्रोडक्शन लेटरच आहे म्हणेनास. काय चमत्कारिक आहेत पहा आमचे देव ! ते एवढे सर्वसाक्षी पण त्यांना देखील ओळख पटायसाठीं गांठीं माराव्या लागतात.

**जानकी** : हो हो लागतात बरं. आंता चर्चा पुरे झाली. चला पाहूं.

**लक्ष्मण** : पण वहिनी मल्हारीच्या पाया पडल्यावर त्याच्याजवळ काय मागूं आम्ही, तें सांगून ठेव.

**जानकी** : तें सुद्धां मींच शिकवायला हवं तुला ? छान ! मल्हारीला म्हणावं लवकरच उर्मिलेच्या डोहाळ्या निमित्त दाराशीं वाजंत्री वाजूं देत.



जानकीः —नाहीं ! हा कंठा मी देणार नाहीं !



जानकी:—तो राक्षस सांगतो तें साफ खोटं आहे.

**लक्ष्मण** : शाबास. हें सुद्धां मल्हारीची कृपा झाली तरच घडणार वाटतं ?

**राघव** : किती चावटपणा करशील रे. आतां चलतोस कीं नाहीं ? ( त्याला धरून नेऊं लागतो. तितक्यांत तुलसी प्रवेश करतो )

**तुलसी** : मल्हारीच्या पुजाऱ्याकडून निरोप घेऊन एक माणूस आलाया. बावासाहेबास्नी भेठायचं म्हनाला. मीं त्येला सांगितलं त्ये वाडीवर गेल्यात, अजून काय आलं न्हाईत. तवा त्यो म्हनाला, हरकत नाहीं, राघवदादांशीं बोलूं. भाईर कचेरींत बसवलाया त्येला.

**राघव** : पुजाऱ्याकडून काय निरोप आणलाय त्यानं ?

**तुलसी** : म्हनं पुजाऱ्यानं सांगून पाठवलंय कीं शितोळ्यांच्या घरची नवरा-नवरी पाया पडाया येनार तर येऊं द्या, पन थोरल्या सूनबाईला संगं आनूं नगा.

**राघव** : आं ? असा निरोप आणलाय त्यानं ?

**तुलसी** : हां, म्हनं पुजाऱ्यानं सांगितलं हाये कीं जानकीला आम्ही देवाला हात लावूं दिला नाहीं तर तुम्ही रागाला याल, म्हून आदी सांगून पाठवलया. नवरा-नवरी बरोबर कुनीबी येऊं द्या, पन जानकी नग.

**लक्ष्मण** : असं काय ? मग तुलसी, पुजाऱ्याचा निरोप. घेऊन जो कोणी आला असेल त्याला सांग, मल्हारीच्या पाया पडायला आल्यावांचून शितोळ्यांच्या घरांतल्या माणसाचं कांहीं अडलेलं नाहीं. जा, सांग त्याला माझा हा निरोप.

**जानकी** : तुलसी, जाऊं नकोस. ( राघवकडे पाहून ) तुम्ही जाऊन त्या माणसाला सांगा, ठीक आहे, शितोळ्यांची थोरली सून येणार नाहीं. फक्त नवरा नवरी येतील.

**लक्ष्मण** : नाहीं, राघव असं सांगूं नकोस. वहिनींनीं येऊं नये असा निरोप मल्हारीच्या पुजाऱ्यानं कां धाडला आहे तें मी ओळखूं शकतों. वहिनी सहा महिने घराबाहेर होत्या यावरून आमच्या घराण्याचे वैरी काय कुजबुजूं लागले आहेत तें थोडंसं माहीत झालंय मला. पण सामान्य चावट लोकांप्रमाणें हे देवाचे पुजारी देखील वागूं पहात असतील तर त्यांच्या त्या फाजील सोवळ्या देवाचं दर्शन घ्यायची माझी इच्छा नाहीं. त्या माणसाला जाऊन सांग, आम्ही कुणीच पाया पडायला येत नाहीं. उर्मिले, चल. हे कपडे आणखी दागिने उतरून टाकूं.

**जानकी :** लक्ष्मण, असं वेड्यासारखं करूं नकोस. मल्हारीच्या दर्शनाला तुम्ही गेलंच पाहिजे.

**लक्ष्मण :** नाहीं वहिनी, तुमचा उपमर्द करणारा पुजारी ज्या देवाचं देऊळ संभाळतो त्या देवाची मला किंमत नाहीं. मल्हारी मार्तंड काय फक्त त्या देवळाच्या चार भिंतींतच आहे ? आपल्या देवघरांतही आहे. हृदयांत आहे.

**जानकी :** पण सारे कुलाचार ठरल्याप्रमाणें केले पाहिजेत, लक्ष्मण.

**लक्ष्मण :** कुलाचार ! हंः ! कुलाचार ! वहिनी, तुमच्यावांचून जाणं हा कुठला कुलाचार ? मी जाणार नाहीं !

**जानकी :** लक्ष्मण, तुला आणि उर्मिलेला गेलंच पाहिजे. माझी आज्ञा तूं ऐकणार कीं नाहीं ?

**लक्ष्मण :** वहिनी, मला असली आज्ञा करूं नका. तुमचा कुणी विनाकारण उपमर्द करावा ही गोष्ट मला सहन होण्यासारखी नाहीं. साफ सांगतों, ज्या देवाला स्पर्श करण्याची तुम्हाला परवानगी नाहीं त्या देवाची मला कांहीं एक किंमत वाटत नाहीं. बेजबाबदार लोकांच्या तोंडची गटारगंगा आणि मल्हारीचं देऊळ यांत अंतर नसेल तर त्या देवळाची पायरी चढण्याची माझी इच्छा नाहीं.

**जानकी :** पण मी सांगतें तुला गेलंच पाहिजे, बाबासाहेब परत आल्याबरोबर विचारतील, तुम्हीं दोघं मल्हारीच्या पाया पडून आलांत काय ?

**लक्ष्मण :** विचारलं तर त्यांना मी सांगेन—

**राघव :** छे छे, बाबांना यांतलं कांहीं एक कळून उपयोगी नाहीं. बाबा आतां घरांत नाहींत हें नशीब म्हणायचं. ते येण्यापूर्वी हा मल्हारच्या दर्शनाचा सोहाळा नीटपणें पार पडला पाहिजे. चल लक्ष्मण, वेळ घालवूं नकोस. ( त्याला ओढून घेऊन जाऊं लागतो. )

**लक्ष्मण :** नाहीं दादा, जिथला पुजारी असला बेशरपणाचा निरोप पाठवूं शकतो तिथल्या देवापुढें माझं मस्तक झुकणं शक्य नाहीं. वहिनी माझं परम दैवत आहेत. मल्हारीचं दर्शन मी घेणार नाहीं.

**राघव :** बाबासाठीं ?

**लक्ष्मण :** नाहीं. बाबांना सार्‍या गोष्टी कळल्या तरी मला त्याची फिकीर नाहीं. वहिनी बरोबर नसतील तर मल्हारीच्या पाया पडायला मी जाणार नाहीं.

**जानकी :** लक्ष्मण, माझ्यासाठीं.

**लक्ष्मण :** वहिनी, तुमच्यासाठीं मी वाटेल तें करीन. पण ही गोष्ट, हा अपमान—

**जानकी :** मुकाट्यानं गिळायचा. लक्ष्मण, माझं ऐक. त्यांच्याबरोबर तुम्ही दोघं जा.

**लक्ष्मण :** वहिनी—

**जानकी :** आतां एक शब्द देखील ऐकणार नाहीं. पुजार्‍याचा निरोप आलाच नव्हता असं समज. मन शांत ठेव. मल्हारीच्या पायावर दोघंजणं डोकं ठेवा आणि कुलदैवताचे आशिर्वाद घेऊन या. आतां माझ्याकडे बघूं सुद्धां नकोस. उचल पाऊल, आणि जा यांच्याबरोबर.

[ बाहेर वाजंत्री वाजूं लागतात. राघव, लक्ष्मण, उर्मिला, तुलशी जातात. जानकी त्यांच्याबरोबर पहात उभी राहते. वाजंत्र्यांचा आवाज हलके हलके दूर जातो. मग जानकी वळते, आणि रामपंचायतनाच्या तसबिरीपुढें जाऊन हात जोडून डोळे मिटून क्षणभर उभी राहते; आणि मग हलक्या पावलांनीं कोचावर जाऊन बसते. तुलसी परत येतो. त्याच्याबरोबर मंजूहि येते. ]

**जानकी :** हें काय, काकाबरोबर तूं नाहीं गेलीस ?

**मंजू :** मला वाटलं होतं तूं सुद्धां येणार आहेस म्हणून मी निघालें होतें. पण काका म्हणाला तुला बरं वाटत नाहीं म्हणून तूं येत नाहींस. मग मीं म्टहलं, आईला बरं वाटत नसलं तर मी घरींच राहते आईजवळ. तुला काय होतं आहे ? डोकं दुखतंय ? औषध आणूं काय ?

**जानकी :** छे ग वेडे. औषध घेण्याइतकं कांहीं होत नाहीं मला.

**मंजू :** तरी पण आणतेंच. तूं आपल्या प्रकृतीची कांहीं काळजी घेत नाहींस. हें कांहीं बरं नाहीं.

**जानकी :** होय आजीबाई, तुम्हींच तेवढ्या शिकवायच्या राहिलां होतां.

**मंजू :** कर माझी चेष्टा. पण तुझी किती काळजी मला वाटते तें तुला काय माहीत ? मी औषध आणतें. तें तुला घेतलं पाहिजे. ( जाते )

**जानकी :** तुलसी–

**तुलसी :** जी.

**जानकी :** झाल्या प्रकारांतलं एक अक्षर देखील बाबासाहेबांना कळतां कामा नये, हें लक्षांत ठेव. नाहींतर खुळ्यासारखं कांहीं तरी बडबडशील.

**तुलसी :** छा. ह्ये म्यां आपल्या तोंडाला कुलूप लावलं बघ. बाबासाहेब आल्यावर ( बाहेर मोटारचा हॉर्न वाजतो )

**जानकी :** बाबासाहेब तर आले नाहींत ? जा चटकन बघ पाहूं ? ( तुलसी जातो. मंजू येते. )

**मंजू :** ( जानकीजवळ येऊन ) हं, हें औषध घे पाहूं. अम् मी हा बाम तुझ्या डोक्याला चोळतें. वर आपल्या खोलींत येऊन पडतेस का जरा ? चल.

[ पडद्यांत बाबासाहेब तुलसीला म्हणतात, " गाडी तशीच उभी राहूं दे. मला नानासाहेब घाटग्यांच्याकडे लगेच जायचं आहे. " ]

**जानकी :** वर कसं जायचं ? बाबासाहेब आले वाटतं वाडीवरनं परत.

[ बाबासाहेब प्रवेश करतात. जानकी त्यांच्या पायाला हात लावून नमस्कार करते. ]

**बाबासाहेब :** मल्हारीच्या पाया पडून आलीं कीं नाहीं लक्ष्मण–उर्मिला ?

**जानकी :** थोड्या वेळांपूर्वींच गेलीं तीं दोघं.

**बाबासाहेब :** तूं नाहीं गेलीस त्यांच्याबरोबर ?

**जानकी :** हे गेले आहेत. मला बरं वाटेना म्हणून मी घरीं राहिलें.

**बाबासाहेब :** डॉक्टरांच्या सांगण्याप्रमाणें औषध घेत नाहींस मग बरं कसं वाटेल ? लक्ष्मणाच्या लग्नांत तुला फार श्रम पडले. आपण सारीजणं वाडीवर जाऊन राहूं म्हणजे तुला विश्रांति मिळून चटकन बरं वाटेल. मी येतांना सांगूनच आलों आहे कारकुनाला सारी व्यवस्था करा म्हणून. काय मंजू वाडीवर जाऊं या ना राहायला ?

**मंजू :** हो हो ! आपल्या बागेतल्या झाडांना आंबे आले असतील ना आतां ?

**बाबासाहेब** : तर ! एकेक फळ अस्सं आलंय. अन् सारीं झाडं लगडलीत नुसती.

**मंजू** : अय्या ! किती मजा !

**बाबासाहेब** : पण कच्च्या कैऱ्या खाल्यास अन् खोकूं लागलीस तर चोप मिळेल हं. आंबे पिकले कीं वाटेल तितके खा, घोड्यावर बस, उड्या मार, खेळ.

[ जानकी आंत जाते. ]

**मंजू** : तुम्ही खेळलं पाहिजे आमच्यांत.

**बाबासाहेब** : ( हंसून ) बर बरं.

**मंजू** : मला बंदुक मारायला शिकवलं पाहिजे.

**बाबासाहेब** : असं काय ? झांशीची राणी होणार आहेस कीं काय ?

**मंजू** : शिकारीला नेलं पाहिजे. बाबा, आतां शिकारी कुत्री बेगम आतां मोठी झाली असेल नाहीं ?

**बाबासाहेब** : तुला सांगायला विसरलोंच. बेगमला पिलं झालीं आहेत.

**मंजू** : कित्ती ?

**बाबासाहेब** : अर्धा डझन.

**मंजू** : इश्श ! मेलीला कांहीं लाज ! बाबा, त्यांतलं एक पिलूं आमच्या हेड-मास्तरबाईंना देऊं ? मी त्यांना कबूल केलंय.

[ जानकी दुधाचा ग्लास घेऊन परत येते. आणि तो बाबासाहेबांच्या पुढें ठेवते. ]

**बाबासाहेब** : अस्सं. तरी म्हटलं आमच्या मंजूला सगळ्या विषयांत फर्स्ट क्लास मार्क्स कसे मिळाले !

**मंजू** : हां ! मीं किती अभ्यास केला होता आईला विचारा.

**बाबासाहेब** : मला माहीत आहे. म्हणूनच विश्रांतीसाठीं वाडीवर चल. तुझ्या आईला तिथें एकदम आराम वाटेल. गुलाबांचे ताटवे फुलले आहेत. जाई जुई बहरल्या आहेत. चिकू आणि आंबे झाडांवर डोलताहेत. विहिरीवरच्या मोटांचा आवाज आणि कोयलचं कुहुकुहु सारखं चालूं आहे. मजा आहे. सगळी जाऊन

राहूं या चार दिवस, या शहराचा मला वीट आला आहे. (दूध पितात) पण मंजू, वाडीवर एक गोष्ट मात्र नाहीं. हं.

**मंजू :** कोणती ?

**बाबासाहेब :** सिनेमा नाहीं.

**मंजू :** नसूं द्या. काका मुळीं मला सिनेमाचा कॅमेराच घेऊन देणार आहे. मीच दाखवीन तुम्हाला सिनेमा.

**बाबासाहेब :** मग हरकत नाहीं.

[ तुलसी प्रवेश करतो ]

**तुलसी :** नानासाहेबांकडून मानूस इचारायला आलाय आपून कवा येता म्हून.

**बाबासाहेब :** मी हा निघालोंच म्हणून सांग त्याला. ( उठतात. तुलसी जातो. )

**मंजू :** बाबा, तुम्ही घाटग्यांच्याकडे जाणार ? मी येऊं तुमच्याबरोबर ? काकाच्या लग्नांतल्या फोटोंचं अलबम त्यांच्या कुसूमनं पाहायला नेलंय तें परत आणायचं आहे मला. येऊं ?

**बाबासाहेब :** चल कीं.

**मंजू :** अन् बाबा, आपल्या बेगमचं एक पिलूं कुसूमला हवं असलं तर देऊं ?

**बाबासाहेब :** म्हणजे, तूं काय बेगमच्या पिलांची वाणं वाटीत सुटणार कीं काय ? ( जानकीकडे पाहून ) किती वेडी ग तुझी ही मुलगी ! ( हंसत हंसत तिला घेऊन जातात. )

[ जानकी कांहीं वेळ थांबते. मग जिन्याकडे वळते. इतक्यांत तुलसी प्रवेश करतो. ]

**तुलसी :** तूं माडीवर निगालीसं व्हय ? भाईर एक मानूस आलाय. तुला भेटायचं हाये म्हनतो.

**जानकी :** कोण आहे ?

**तुलसी :** रोजच्यांतला दिसत न्हाई. म्या नांव इचारलं तर म्हनाला भ्यारीलाल !

**जानकी :** बिहारीलाल !

**तुलसी :** हां.

**जानकी :** पाठवून दे त्याला आंत. आणखी हें बघ, तूं डॉक्टरांच्याकडे जाऊन माझें औषध घेऊन ये. (तुलसी जातो. ती कोचावर बसतें.) बिहारीलाल! आतां कसं करूं ?

[ बिहारीलाल प्रवेश करतो. ]

**बिहारीलाल :** नमस्ते.

**जानकी :** (त्याच्याकडे पाहून– शहारे देऊन हळूं आवाजांत) नमस्ते. बैस. मंडळी बाहेर गेली आहेत, ती केव्हां येतील नेम नाहीं. पांचच मिनिटं मला तुझ्याशीं बोलतां येईल.

**बिहारीलाल :** पांच मिनिटांत मला मोकळं कर म्हणजे झालं.

**जानकी :** काय करूं ?

**बिहारीलाल :** मला वचन दिलसं ते पुरं कर.

**जानकी :** आणखी थोडा अवधि दे मला. थोडी वाट बघ.

**बिहारीलाल :** आठ दिवसांपूर्वी डॉक्टरांच्या दवाखान्यांतून बाहेर पडतांना मी तुला पाहिलं, अन् तुला भेटलों, तेव्हां म्हणालीस, आठ दिवसांनीं ये, तंवर वाट बघ. आतां पुन्हा तेच सांगतेंस? आतां नाहीं वाट बघणार. मला फसवायचा बेत दिसतोय तुझा. इथें आपल्या घरीं सुखरूप आलीस, तेव्हां आपल्या वचनाचा विसर पडला तुला. माझ्या उपकाराची तुला आठवण राहिली नाहीं.

**जानकी :** आठवण आहे. पुरती आठवण आहे. पण—

**बिहारीलाल :** पण काय ?

**जानकी :** पांच हजार रुपये कुठले देऊं मी ?

**बिहारीलाल :** वचन देतांना हा विचार करावयाचा होतास. पांच हजार रुपये द्यायचे कबूल केलंस म्हणून ना मी माझ्या दोस्तांना फसवून तुला त्यांच्या पाहाऱ्यांतून काढली, आणि दिल्लीला आणून निर्वासितांच्या छावणींत सोडली ?

नाहीं तर माझं काय अडलं होतं ? माझे दोस्त तुला विकून टाकणार होते. गेली असतीस एखाद्या कुंटणखान्यांत.

**जानकी :** ( कानावर हात ठेवून ) स्! हळूं बोल.

**बिहारीलाल :** ( आवाज हळूं करून ) तुझ्या विक्रीनं आलेल्या पैशांतला माझा हिस्सा मिळाला असता. पण तूं माझे पाय धरलेस, पांच हजार रुपये द्यायचे कबूल केलंस, गळ्यांतल्या मंगलसूत्राची शपथ घेतलीस, म्हणून तुझी सुटका केली. मी केसाला तरी धक्का लागूं दिला तुझ्या ? लुटारूंच्या टोळींतला मी, पण मी, नीति संभाळली. नेकीनं वागलों. तुम्ही सरदार कुळांतलीं माणसं, तुम्ही मात्र नेकीनं वागायला विसरतां. मला वचन दिलंस कीं माझ्या घरीं मी पोचलें कीं महिन्यानं पैसे देईन. मी बरोबर महिन्यानं आलों. आठ दिवस थांब म्हणालीस, थांबलों. पण आजही तूं आपलं वचन पुरं करीत नाहींस. मी तुला पळवून दिल्लीला पोचवलं नसतं तर यावेळीं तुझी काय दशा झाली असती ? रावळपिंडीच्या सफेत गल्लींतल्या एखाद्या मकाणाच्या खिडकींत तोंड रंगवून बसावं लागलं असतं तुला ! ( जानकी कानावर हात ठेवते, डोळे झांकते, शहारे देते. ) खोटं आहे कां मी म्हणतों तें ?

**जानकी :** नाहीं. तुझे माझ्यावर फार उपकार झाले आहेत. माझ्या कातड्याचे जोडे करून तुझ्या पायांत घातले तरी तुझे उपकार फिटायचे नाहींत. माझं वचन मी विसरलें नाहीं, पण–पण थोडा थांब.

**बिहारीलाल :** अंहं ! आतां थांबायची बात करूं नकोस. इथें या शहरांत मला धोका आहे. पोलीस माझ्या पाळतीवर असतील, हें मला विसरतां येणार नाहीं. माझ्या कामगिरीची भर किंमत मला आत्तां मिळाली पाहिजे.

**जानकी :** दोन दिवस थांब. काय वाटेल तें करून–घरांत चोरी सुद्धां करून ( रडूं लागते ) मी तुला पैसे देईन, पण दोन दिवस थांब.

**बिहारीलाल :** थांबतां येणार नाहीं मला. तुला देतां येत नसले पैसे तर तसं सांग. तुझ्या सासऱ्याला, नवऱ्याला तुझं वचन सांगतों. ते देतील पैसे.

**जानकी :** छे छे, असं करूं नकोस. त्यांना कांहीं कळतां कामा नये. त्यांना सांगूं नकोस.

**बिहारीलाल :** तूं माझा सवाल पुरा कर, मग मी त्यांना कशाला सांगतोय ? मला काय ? माझे पैसे मिळाले म्हणजे झालं.

**जानकी :** पांच हजार रुपये मी कुठले आणूं ?

**बिहारीलाल :** तें मी काय सांगूं ? मला माझे पैसे हवेत एवढं खरं.

**जानकी :** ( विचार करून ) उद्यां देतें, तंवर थांब.

**बिहारीलाल :** ( विचार करून ) अच्छा, उद्यां केव्हां येऊं ? सकाळीं ?

**जानकी :** अं हं !

**बिहारीलाल :** संध्याकाळीं ?

**जानकी :** हो, आतां जा. इथें फार वेळ थांबू नकोस. मंडळी येतील–जा. ( तो उठत नाहीं असं पाहून ) उद्यां संध्याकाळीं पैसे द्यायचं कबूल केलं ना ? मग जात कां नाहींस तूं ?

**बिहारीलाल :** तसा कसा जाऊं ? आठ दिवसांपूर्वी आजचा वायदा केलास, पण तो पुरा केला नाहींस. तूं आपला उद्यांचा वायदा तरी खरा करशील याची कांहीं खूण पटवशील कां नाहीं ?

**जानकी :** खूण काय पटवूं ?

**बिहारीलाल :** तुझ्या अंगावरचा एखादा जेवर दे. अगदींच रिकाम्या हातानं मी आज जाणार नाहीं.

**जानकी :** ( इकडे तिकडे पहात ) अंगावरचा दागिना गेल्याचं कोणाच्या लक्षांत आलं म्हणजे ?

**बिहारीलाल :** उद्यां तुझ्याकडून पांच हजार रुपये मिळाल्यावर मी परत देईनच कीं. एका दिवसाची तर बात आहे.

**जानकी :** ठीक आहे. या बांगड्या घे. ( काढूं लागते. )

**बिहारीलाल :** शीः ! त्या बांगड्यांची अशी कितीशी किंमत होणार आहे ?

**जानकी :** ( थबकून ) मग काय देऊं ?

**बिहारीलाल :** तो मोत्याचा कंठा दे.

**जानकी :** ( झटकन गळ्यावर हात ठेवून. ) हा ? ( मान हलवते ) लक्ष्मणच्या लग्नाच्या वेळीं त्याच्या बायकोला अन् मला दोघींना एकसारखे कंठे बाबासाहेबांनीं हौसेनं केले. ( पुन्हा मान हलवते ) हा नाहीं मिळायचा तुला.

**बिहारीलाल :** तो मिळाल्याशिवाय मी इथून हलणार नाहीं. उद्यांचा तुझा वायदा खरा समजून मी आतां जावं अशी तुझी इच्छा असेल तर गळ्यांतला कंठा तुला दिलाच पाहिजे. उद्यां तो तुझा तुला मी परत करीन. मी नेकीनं वागणारा आहे हें तुला माहीत आहे. शिवाय दागिनें विकण्यांत धोका असतो. आम्ही दागिन्यांच्या वाटेला सहसा जात नाहीं. उद्यां तूं माझ्या हातावर पैसे ठेव, दुसऱ्या हातानं मी तुझा कंठा परत देईन कीं नाहीं पहा. दे तो कंठा.

**जानकी :** ( कंठ्यावर हात धरून भेदरलेल्या दृष्टीनं जोरानं मान हालवते. ) तुला कंठा देणार नाहीं मी.

**बिहारीलाल :** ठीक आहे, मग मी इथें बसून राहातों. येऊं देत तुझीं माणसं.

**जानकी :** नको नको. असा घात करूं नकोस. जा. जा.

**बिहारीलाल :** कंठा दे, म्हणजे जातों.

**जानकी :** उद्यां तूं कंठा देशील यावर मी विश्वास कसा ठेवूं ?

**बिहारीलाल :** उद्यां तूं पांच हजार रुपये देशील यावर मी कसा विश्वास ठेवला ? ( हंसतो. ) काढ, कंठा दे.

**जानकी :** ( हुंदका देते पण मग डोळे मोठे करते. ओठ दातांखालीं धरते, आणि कंठा काढते. ) घे.

**बिहारीलाल :** थँक्यू यू ! जातो. उद्यांचा वायदा चुकवूं नको. केव्हां येऊं ? याच वेळेस ?

**जानकी :** ( शून्य दृष्टीनें समोर बघत. ) याच वेळेस.

**बिहारीलाल :** अच्छा नमस्ते. ( झपाझप पावलं टाकीत निघून जातो )

[ जानकी क्षणभर अंतराळांत शून्य दृष्टीनं पहात राहते आणि मग "आई ग" असा उद्‌गार काढून दोन्ही हातांनीं तोंड झाकून घेते.

हुंदक्यामुळें तिचं शरीर गदगदा हलतं. ती कोचाच्या पाठीवर मान टाकते आणि डोळे मिटून घेते... कांहीं वेळानं दाराशीं वाजंत्री वाजूं लागतात. परंतु तिला तीं ऐकूं येत नाहींत. उर्मिला दिवाणखान्यांत येते तेंहि तिला कळत नाहीं.]

**उर्मिला :** ( घाईघाईनं जिन्याशीं जाऊन माडीकडे पहात ) जानकी ! ए जानकी ! ( तितक्यांत तिचं लक्ष जानकीकडे जाते व ती झटकन् तिच्याचवळ जाते. ) हें काय ? तूं रडते आहेस ? जानकी ! जानकी ! काय झालं ?

**जानकी :** तो गेला काय ?

**उर्मिला :** कोण गेला काय ? कोण आला होता ?

**जानकी :** कोणी नाहीं.

**उर्मिला :** तूं अशी भेदरलेली कां दिसनेस ? रडते आहेस काय म्हणून ? काय झालं ? मला सांग ना.

**जानकी :** कर्माचीं फळं माणसानं भोगलींच पाहिजेत. नाहींतरी मी मेल्यासारखींच होतें.

**उर्मिला :** हें काय बोलतेस तूं ? राघवला लक्ष्मणला बोलावूं काय ?

**जानकी :** नको नको. त्यांना यांतलं एक अक्षरदेखील कळतां कामा नये. माझ्या संकटाशीं मला एकटीलाच झगडलं पाहिजे. पण मार्ग दिसत नाहीं. काय करूं ? ( रडूं लागते आणि उर्मिलेच्या खांद्यावर डोकं टेकते. )

**उर्मिला :** ( दाराकडे पाहून ) राघव ! लक्ष्मण ! अरे लवकर या !

[ राघव लक्ष्मण प्रवेश करतात. जानकीला पाहिल्या बरोबर " जानकी, जानकी " असं म्हणत राघव आणि " वहिनी, वहिनी " असं म्हणत लक्ष्मण दोघेहि तिच्याजवळ जातात. त्यांचे ते शब्द आणि जानकीचे हुंदके बाहेरच्या वाद्यांच्या स्वरांत मिसळतात. ]

# ३

[ दुसऱ्या दिवशींची संध्याकाळ. शितोळ्यांचा दिवाणखाना. तुलसी जळत्या चंदनाची थाळी घेऊन येतो व ती फिरवितो. नंतर हाराचा पुडा आणून एका चांदीच्या ताटांत तोडून ठेवतो. थोड्या वेळानं बाबासाहेब येतात, त्यांच्यापुढें तुलसी हाराचं ताट धरतो. ते हार रामपंचायतनाच्या तसबिरीला घालतात. ]

**बाबासाहेब** : सारी मंडळी फिरायला गेली का रे ?

**तुलसी** : न्हाई. आपापल्या कामाला गेल्यात. जानकी बरिक हाये आपल्या खोलींत.

**बाबासाहेब** : आज दिवसभर निजूनच आहे म्हणे. अजून तिची तब्बेत पुरती सुधारेना. काय करावं कांहीं कळत नाहीं. मंजू कुठें आहे रे ?. गाण्याचं प्रॅक्टिस नाहीं झालं वाटतं तिचं आज ? शाळेंतून परत आल्यावर तिची गडबड ऐकू यायची तीहीं आज आलीं नाहीं.

**तुलसी** : साळतनं यायला न्हाई अजून ती.

**बाबासाहेब** : म्हणजे काय ? सात वाजून गेले कीं.

**तुलसी** : तिच्या साळत आज शिनिमा हाये म्हन.

**बाबासाहेब** : आं ? शाळेंतसुद्धां सिनेमा व्हायला लागला का ? मुलींना शिकायला पाठवायची सोय राहिली नाहीं. कसला सिनेमा आहे ?

१५५९

**तुलसी :** शेती बागायतीच्या माहितीचा हाये सांगत व्हती मंजू.

**बाबासाहेब :** मग हरकत नाहीं. मला वाटलं रतन, रामजोशी असला आहे.

**तुलसी :** छे छे! तसला कसा असल. पोरींच्या मुरळ्या करायच्यात काय बाईंना?

**बाबासाहेब :** कांहीं नियम सांगू नकोस या शाळामास्तरणींचा. घरंदाजपणा, खानदानी, अब्रु या गोष्टींची कुणाला किंमतच वाटेनाशी झाली आहे. वाटेल तें झालं तरी घराण्याची अब्रु राखली पाहिजे म्हणणारी आमच्यासारखीं माणसं वेडी ठरायेंची वेळ आली आहे.

**तुलसी :** आपली क्लबांत जायची वेळ झाली? जाणार काय?

**बाबासाहेब :** हो जाऊन येतों जरा. नानासाहेबांना कबूल केलंय, ते वाट पाहतील. जाऊं मी? मंजू आली कीं तिला म्हणावं —

(बाहेर हॉर्न वाजतो.)

**तुलसी :** ही मंजूच आली वाटतं.

**बाबासाहेब :** असं दिसतंय. (दाराकडे जातात. त्यांची व मंजूची दारांत गांठ पडते.) मंजू, तुझी बाजाची पेटी चार दिवसांत येणार बरं कां. कलकत्त्याच्या कंपनीचं पत्र आलंय् आज.

**मंजू :** (चिडलेल्या आवाजांत) त्यांना तार करा उद्यां पेटी नको म्हणून. पेटीबिटी कांहीं नको मला. मला गाणं शिकायचं नाहीं. शाळेंत जायचं नाहीं. समजलांत?

**बाबासाहेब :** म्हणजे काय? अशी संतापली आहेस का? तुझा चेहरा असा रडवा कां झाला आहे?

**मंजू :** रडलेंच आहे मी. संतापलेंच आहे. सरदार घोरपड्यांच्या मैनेला मीं खूप बडवलं. उद्यां मी शाळेंत जाणार नाहीं. माझं नांव काढून टाका त्या शाळेंतून. (पुस्तकं वह्या फेकून देते व कोचावर बसून रडूं लागते.)

**बाबासाहेब :** अरेच्या! काय झालं सांग तरी. मैनेला मारलंस? काय केलं तिनं?

**मंजू** : फार द्वाड आहे ती. बाई मध्यें पडल्या म्हणून, नाहीं तर आज तिचा प्राणच घेत होतें. ( रडते. ) मला त्या शाळेंत जायचं नाहीं. शिकणं बुडलं तरी चालेल. त्या शाळेचा उंबरठा चढणार नाहीं मी.

**बाबासाहेब** : पण काय झालं काय ? सांगशील तर खरं !

**मंजू** : वर्गातल्या मुली मला चिडवतात. टोंचून बोलतात. घोरपड्यांच्या मैनानं चिथवलं आहे सगळ्यांना. ती माझ्या आईविषयीं वाईट वाईट बोलते अन् मला म्हणते विचार आपल्या घरीं खरं कां खोटं !

**बाबासाहेब** : काय म्हणते तरी काय ?

**मंजू** : म्हणते कीं–छे छे ! मला नाहीं तोंडांतून काढवायचे ते घाणेरडे शब्द. माझी आई अशीं खाचित नाहीं. असं कोणी बोललं तर मी ऐकून घेऊं कीं काय ? मैनेचा जीवच घेणार होतें मी आज. तिचे भाऊ म्हणे ज्याला त्याला असंच सांगत असतात. फार चावट आहेत ते.

**तुलसी** : कल काय म्हनालों मी ? त्या उरपाट्या घोरपड्यांचा गुलामांनीं लई हलकटपना चालविलाय. गवसू द्या. येककाला तुटस्तवर नाहीं ठोकला भुईंचालीच्या पैजारानं तर माझं नांव तुलसी न्हवं. मुस्काड फोडतो येककाचं.

**बाबासाहेब** : कितीजणांची तोंडं फोडशील तूं ?

**मंजू** : भेटतील तेवढ्या सगळ्यांची फोड रे तुलसी. जिभेला कांहीं हाड आहे कीं नाहीं ? बाबा, तुम्ही खरे असाल तर आत्तांच्या आत्तां जा घोरपड्यांच्या घरीं, अन् म्हणावं–मी येऊं काय तुमच्याबरोबर ? ( उठते. )

**बाबासाहेब** : वेडी का तूं मंजू ?

**मंजू** : मला माहीत आहे. तुम्ही मलाच वेड्यांत काढणार. ठीक आहे. नका येऊं मीच जातें, अन् मैनाच्या वडिलांना विचारतें–तुलसी, तूं येतोस माझ्या बरोबर ?

**तुलसी** : चल. मी तयार हये.

**बाबासाहेब** : ए मूर्खांनो, तुम्हांला जाहीर तमाशा करायचा आहे कीं काय ? परत फिरा पाहूं. आपण शांतपणें विचार करूं अन् मग उद्यां–ऐकलंस कां मंजू ? फिर मागं.

**मंजू** : उद्यांपर्यंत धीर कसा धरूं? मैनाची व इतर मुलींची तीं बोलणीं तुम्ही ऐकायला हवींत, म्हणजे माझ्या अंगाची कशी लाही होते तें कळेल तुम्हांला. मी आत्तां जाणार.

**बाबासाहेब** : मंजू! परत फिर. फिर मागं. ( ती रडते ) रडणं भोकणं काय करायचं असेल तें इथं घरांत, आपल्या खोलींत. ऐकलंस कां? फिर मागं, अन् आपल्या खोलींत चालती हो पाहूं. ऐकतेस कीं नाहीं?

**मंजू** : ऐकते हो! ( परत वळते, जिन्याच्या पायथ्याशीं थांबते. ) तुम्हीं फार वाईट आहांत. मला वाटलं होतं तुम्ही माझा कैवार घ्याल.

**बाबासाहेब** : तूं माझी कितीही लाडकी असलीस—

**मंजू** : आहे असं वाटलं होतं. आतां नाहीं वाटत. ( रडते )

**बाबासाहेब** : भलत्या गोष्टींत मी नाहीं कैवार घेणार.

**मंजू** : नका घेऊं. उद्यांपासून मी त्या शाळेंत मात्र पाऊल ठेवणार नाहीं. ( पाय आपटीत, हुंदके देत पायऱ्या चढून जाते. )

**बाबासाहेब** : ( कांहीं वेळ तिच्याकडे पहात राहतात, नंतर वळून स्वतःशींच उद्गारतात. ) हं!

**तुलसी** : घोरपड्यांचा त्यो दिवाणजी हये बगा या साऱ्या चावटपणाच्या मुळाशीं. त्यानंच सुरूं केली हये ही सारी हलकट कुजबुज. भेटंलच कीं कुठं तरी मला. एका तोंडाची दोन करतों.

**बाबासाहेब** : अशानं दोहोंचीं चार तोंडं होतील, अन् कुजबुज वाढेल मात्र. ( अर्धवट स्वतःशींच ) आपलाच दाम खोटा. लोकांच्या तोंडाला लागण्यांत काय अर्थ?

**तुलसी** : असं कां म्हनतां? म्हनूं देनार नाहीं आपल्याला. जानकीवर विश्वास न्हाई हं आपला?

**बाबासाहेब** : माझ्या विश्वासाचा प्रश्न नाहीं. तुला कळायचं नाहीं तुलसी. जाऊं दे. आतां नकोच हा विषय. मी जाऊन येतों क्लबावर. ( भराभर पावलं टाकीत निघून जातात. )

**तुलसी** : ( मंजूनं फेकून दिलेलीं पुस्तकं वह्या गोळा करतो. टेबलावर ठेवतो. वरच्या बाजूस असलेल्या जानकीच्या फोटोकडे कांहीं वेळ पहात राहतो. ) आपलाच दाम खोटा ? धनी, या सोन्यासारख्या सुनंबद्दल असलं शब्द तुमच्या तोंडून बाहेर पडलं तरी कसं ? ( जानकी हलके हलके खालीं येते व कोचावर बसते. ) तुला आतां बरं वाटतंय ?

**जानकी** : पुष्कळ बरं वाटतंय.

**तुलसी** : सरबत हवं कां तुला थोडं ?

**जानकी** : नुसतीच इथं बसणार आहे मी जरा. ( दारावरची घंटा वाजते. ) कोण आलंय बघ. ( तुलसी जातो व थोड्या वेळानं परत येतो. )

**तुलसी** : त्ये कालचे गिरस्त आल्यात. काय त्येचं नांव भ्यारीलाल.

**जानकी** : असं का ?

**तुलसी** : सांगू त्येना तुला बरं न्हाई म्हून ?

**जानकी** : कशाला ? ते काय पांच मिनिटं बसतील अन् जातील. घेऊन ये त्यांना आंत. ( तुलसी जातो व बिहारीलालला घेऊन येतो. )

**बिहारीलाल** : नमस्ते !

**जानकी** : नमस्ते. बसा. तुलसी, राघव लक्ष्मण आहेत कां रे घरांत ?

**तुलसी** : नाहीं.

**जानकी** : उर्मिला ?

**तुलसी** : तीही नाहीं.

**जानकी** : तूं असं कर. ( विचार करून ) शहरांत जा अन् आपल्या नेहमींच्या दुकानांतून अॅस्प्रोचं पाकीट घेऊन ये. ( तो जाऊं लागतो. ) आणखी हें बघ, येतांना ( विचार करून ) शिंप्याकडे जाऊन माझा ब्लाऊझ झाला असला तर घेऊन ये. आज देतो म्हणाला होता.

**तुलसी** : शिंपी कधीं येळंला पावतो व्हय ? काजं कराची ऱ्हाइलीत म्हनल, मी गेल्या बिगर सांगतों.

**जानकी :** तसं तो म्हणाला तर बसून करून घे काजं, अन् मगच ये.

**तुलसी :** पर तुला अस्प्रो आधी हवा असेल ना ?

**जानकी :** नाहीं , इतकं नाहीं डोकं दुखत माझं. सावकाश आलास तरी चालेल. ( तुलसी जातो. ती डोळे घट्ट मिटून कांहीं वेळ स्वस्थ बसते, मग डोळे उघडून बिहारीलालकडे पाहते व उद्गारते ) हं !

**बिहारीलाल :** आलों.

**जानकी :** होय आलास. मृत्यु देखील इतका वक्तशीर येत नसेल. तुझ्या रुपानं आत्तां मृत्यु देखील येईल अन् माझे प्राण मागेल तर ती केवढी भाग्याची गोष्ट होईल !

**बिहारीलाल :** मी तुझे प्राण कशाला मागूं ? मला त्यांचा काय उपयोग आहे ? ( उर्मिला दारांत येते. ) पैशाची किंमत जास्त आहे मला. पैसे दे. ( हे शब्द ऐकून उर्मिला दचकून उभी राहते व मग आड होते. ) हा तुझा कंठा तुला परत द्यायसाठीं घेऊन आलों आहे. मी माझ्या शब्दाला जागलों. तूं आपला शब्द खरा कर .

**जानकी :** हा कंठा तीन हजार रुपयांचा आहे.

**बिहारीलाल :** असेल. मोती सुंदर आहे. तुला शोभेल असाच आहे कंठा.

**जानकी :** तो मला परत देऊं नकोस. तूं घे.

**बिहारीलाल :** मला काय करायचा आहे ?

**जानकी :** त्याचे पैसे करून घे.

**बिहारीलाल :** बाजारांत असले जेवर विकणं धोक्याचं असतं.

**जानकी :** पण तीन हजार रुपये —

**बिहारीलाल :** ज्या जगांत मला तो बिनधोक विकतां येईल त्या जगांत याची निम्मी किंमत उतरेल.

**जानकी :** तरी दीड हजार रुपये तरी होतील ?

**बिहारीलाल :** ( विचार करून ) ठीक आहे. बाकींचे साडेतीन हजार ?

**जानकी :** साडेतीन हजार ? मी तुला पाठवीन. मला तुझा पत्ता देऊन ठेव. ( बिहिरीलाल हंसतो. ) कां, हंसलास कां ?

**बिहारीलाल :** तुझ्या खुळेपणाचं हंसू येतं. आमच्यासारख्यांना पत्ता असतो काय ? कायदा अन् पोलिसांची नजर चुकवून जिथें राहतां येईल तो आमचा पत्ता. भलत्या वेडेपणाच्या गोष्टी आतां काढूं नकोस. पैसे दे.

**जानकी :** अरे पण कुठले देऊं ?

**बिहारीलाल :** आज यायला सांगितलंस तेव्हां काय विचार केला होतात ? कुठले पैसे देणार होतीस ?

**जानकी :** घरांत चोरी करायचं ठरवलं होतं.

**बिहारीलाल :** मग कां नाहीं केलीस ?

**जानकी :** धीर झाला नाहीं म्हणून. असल्या पापाची सवय नाहीं म्हणून. ( हुंदके देते. ) मला असलं पाप करायला लावूं नकोस.

**बिहारीलाल :** नको करूंस पाप. पुण्य कर. माझे पैसे दे म्हणजे झालं.

**जानकी :** माझ्यावर दया कर.

**बिहारीलाल :** एकदां केली तुझ्यावर दया. माझे दोस्त तुला विकून टाकणार होते तेव्हां तुला संकटांतून सोडवलं. त्या दयेची किंमत द्यायचं तूं कबूल केलं होतंस. ती किंमत द्यायच्या ऐवजीं तूं आपली माझ्याजवळच दया मागतेस होय ? कर्जाचा तगादा करणाऱ्या सावकाराजवळ आणखी कर्ज मागणाऱ्या पटाईत धंदेवाल्याचा बेशरमपणा तुला करतां येतो म्हणायचा ? माझ्या उपकारांची किंमत टाक.

**जानकी :** तुझ्या उपकारांची किंमत म्हणूनच तो कंठा दिला.

**बिहारीलाल :** ती भर किंमत नाहीं. ती मिळाल्याशिवाय मी जाणार नाहीं.

**जानकी :** असा निष्ठुर होऊं नकोस. माझ्या गळ्याशपथ या घटकेला मला पैसे देणं शक्य नाहीं.

**बिहारीलाल :** ठीक आहे. मग दुसरा मार्ग सुचवितों.

**जानकी** : ( आशेनं ) मुदत देतोस ? सांग. मी माझं वचन खचीत पुरं करीन. किती थांबशील ?

**बिहारीलाल** : एक क्षणही थांबणार नाहीं.

**जानकी** : मग दुसरा मार्ग कोणता म्हणालास ?

**बिहारीलाल** : होय, दुसरा मार्ग आहे. अंगावरचे सारे दागिने काढून दे. तेवढ्यांत माझे सारे पैसे वसूल व्हायचे नाहींत, पण होतील तेवढ्यांत मी समाधान मानीन.

**जानकी** : कंठा माझ्या गळ्यांत दिसला नाहीं तर मी कशी तरी बतावणी करीन, पण सारे दागिने नाहींसे झाल्यावर मी काय सांगूं ?

**बिहारीलाल** : तो प्रश्न माझा नाहीं. काढ दागिने.

**जानकी** : मी तुझ्या पाया पडतें. असा छळ करूं नकोस. ( रडते. )

**बिहारीलाल** : रडण्या भेकण्याचा कांहीं उपयोग होणार नाहीं. तुला वेळ नाहीं. मला वेळ नाहीं. आटप. दे दागिने.

**जानकी** : दागिने देतां येणार नाहींत मला.

**बिहारीलाल** : ठीक आहे. येऊं देत तुझ्या घरची माणसं, सांगतों त्यांना कीं या बाईची अब्रू उरलेली नाहीं.

**जानकी** : ( एकदम ओरडून ) चांडाळा, खोटं बोलूं नकोस.

**बिहारीलाल** : खोट्या खऱ्याची मला काय पर्वा ? तुला हांकून दिली त्यांनीं तर मला थोडंच वाईट वाटणार आहे ? उलट तूं रस्त्यावर आलीस तर मी तुला आश्रय देईन. धंद्याला भांडवल मिळेल मला.

**जानकी** : राक्षसा ! असं भयंकर बोलतांना तुझी जभि कशी झडत नाहीं ?

**बिहारीलाल** : ते भयंकर टाळायचं असेल तर माझा सवाल पुरा कर. दागिने दे.

**जानकी** : अरे निर्दया ! ( रडते, पण मग एकदम मान वर करते व निश्चयानं म्हणते. ) ठीक आहे, घे. ( गळ्यांतली चेन काढूं लागते. )

**ऊर्मिला** ( एकदम पुढें होऊन ) जानकी ! थांब !

**जानकी :** ( दचकून वळून पाहून आश्चर्यानें ) कोण ? ऊर्मिला ?

**उर्मिला :** ( पुढें येतां येतां ) होय, मीच. ( जवळ येऊन ) हे गृहस्थ कोण म्हणून विचारीत नाहीं. त्यांचं अन् तुझं बोलणं मीं ऐकलं आहे. काल तूं विचारलसं, तो गेला काय ? तो कोण तें मला आतां कळलं. याला तूं कंठा दिला आहेस ? अन् आतां सारे दागिने देणार होतीस ? केवळ यानं गप्प बसावं म्हणून ? घरच्या माणसांना कांहीं कळूं नये म्हणून ? वेडी आहेस तूं. तुला असा वेडेपणा करूं देणार नाहीं मी. ( बिहारीलालला ) अहो मिस्टर, कंठा इकडे द्या पाहूं मुकाट्यानं.

**बिहारीलाल :** ( तिला न्याहाळून पाहून जानकीला ) या कोण ?

**जानकी :** ही माझी—

**उर्मिला :** कोण तें मी सांगते मग तुम्हांला. आधी कंठा द्या. मी या घरांतलीच आहे. चोर नाहीं.

**बिहारीलाल :** मी चोर आहे असं म्हणणं कीं काय तुमचं ? हा कंठा मी कांहीं चोरलेला नाहीं. जानकीनं राजीखुषीनं अक्कलहुषारीनं दिलेला आहे तो मला.

**उर्मिला :** राजीखुषीनं असेल कदाचित्, पण अक्कलहुषारीनं नाहीं. तुमच्या भीतीनं तिची अक्कल ठिकाणावर राहिलेली नाहीं.

**बिहारीलाल :** मी काय भीति घातली तिला ? तिनं आपलं वचन पुरं करावं, माझ्या उपकाराची ठरलेली किंमत मला मिळावी येवढंच म्हटलं ना ? यांत काय चुकलं ? तिला आपलं वचन पुरं करतां येत नसेल तर तिच्या माणसांना सारी हकिकत सांगून त्यांच्याकडून माझे पैसे मला वसूल करावे लागतील असं मी म्हटलं, तर हिला त्यांत भ्यायचं काय कारण ?

**उर्मिला :** कांहींच कारण नाहीं. तेंच मी तिला आतां सांगणार आहे. अन् तुम्हांला सांगणार आहे कीं हिच्या माणसांना जरूर सांगा हिची सारी हकिकत अन् त्यांच्याजवळ मागा तुमचे पैसे. फार वेळ थांबावं लागायचं नाहीं तुम्हांला. आतां येतीलच सगळीजणं.

**जानकी :** उर्मिले, तुला वेड लागलं आहे कीं काय ? माझा सरळ घात करते आहेस तूं.

**उर्मिला :** नाहीं जानकी, तुला वांचवतें आहे मी. घातापासून तुझं रक्षण करते आहे. या दुष्टाच्या भयांतून तुला मुक्त करते आहे. दागिने देऊन तूं याला आज घालवलं असतंस, तुला वाटलं असतं सुटलीस, पण सहा महिन्यांनंतर हा पुन्हा येऊन तुझ्याजवळ पैसे मागणार नाहीं कशावरून? वरचेवर हा तुला धाक दाखवून लुबाडणार नाहीं कशावरून? तुझी भीति म्हणजे याला सोन्याची खाण सांपडणार आहे. याची बँक होणार आहेस तूं. केव्हांही यावं, धाक दाखवावा, हुंडी पेटवावी, पैसे घ्यावे, अशी याची सोय करणार आहेस तूं. याची बँक बुडवून टाकली पाहिजे. लक्ष्मणला, राघवला, बाबासाहेबांना कळूंदेच एकदां सारी हकिकत. कोणी कांहीं वांकडं करणार नाहींत तुझं. उलट तूं कायमची निर्भय होशील. सुखांत राहशील.

**जानकी :** उर्मिले, भ्रम आहे तुला. तसं व्हायचं नाहीं. बाबासाहेबांच्या स्वभावाची नीट कल्पना नाहीं तुला. मी करते आहे तेंच बरोबर आहे (बिहारीलालला) आतां तूं अधिक थांबू नकोस. जास्त कांहीं मागूं नकोस. कंठा मिळालाय तुला तेवढा पुरेसा म्हण. जा, पुन्हा येऊं नकोस. तुझे उपकार विसरायचे नाहींत मला. त्याची फेड करणं माझं कर्तव्य आहे. तो कंठा घे अन् जा.

**उर्मिला :** जानकी असं करूं नकोस.

**जानकी :** गप्प बस उर्मिले. (बिहारीलालला) जा तूं. इथें अधिक थांबण्यांत तुला धोका आहे. जा, पुन्हा येऊं नकोस.

**बिहारीलाल :** (विंचार करून) ठीक आहे. (उठतो व जाऊं लागतो तितक्यांत तुलसी येतो.)

**तुलसी :** जानकी—

**उर्मिला :** तुलसी या माणसाला बाहेर जाऊं देऊं नकोस. घरांत चोरी करून पळतो आहे तो.

**तुलसी :** चोरी ? ह्यो चोरी करून पळतुया ? दिसायला तर चांगला जंटलमन दिसतोय्. काल बाबासाहेब याला चा काफी देणार व्हतं. त्येंच्या मांडीला मांडी लावून बसला होता हा.

**उर्मिला :** आज गळा कापायचा होता ना जानकीचा.

**तुलसी :** म्हंजी ?

**उर्मिला :** त्याच्या खिशांत जानकीच्या गळयांतला कंठा आहे, बघ.

**तुलसी :** आं ? ( त्याला धरतो व ऊर्मिलेकडे आणूं लागतो. )

**बिहारीलाल :** सोड मला. ( हात हिसकतो, पण तो सोडवितां येत नाहीं. )

**तुलसी :** ( हंसून ) अर, उगीच कां वळवळतोस मुंगसाच्या तोंडातल्या सापागत ? म्हातारा वाटलो व्हय तुला ! मनगाट दाबलं तर पानीबी पिऊं देणार न्हाई. दाखवूं काय नमुना ? ( मनगट दाबतो. )

**बिहारीलाल :** ( विव्हळून ) आः ! अरे भाई- आः ! छोड दो, छोड दो.

**तुलसी :** कंठा सोड म्हंजी तुला सोडतो.

**बिहारीलाल :** ( कंठा देऊन ) सोड आतां माझा हात. जाऊं दे मला, सोड-

[ राघव व लक्ष्मण प्रवेश करतात. ]

**बिहारीलाल :** ( हिसकाहिसकी करीत ) सोडतोस कीं नाहीं ?

**तुलसी :** उर्मिलेनं सांगितल्याशिवाय न्हाई सोडणार. चळवळ करूं नग. पुन्हा दाबूं काय मनगाट ?

**लक्ष्मण :** हा काय प्रकार आहे ? कोण गृहस्थ हे ?

**उर्मिला :** ( जवळ जाऊन ) तुम्हांला दोघांना भेटायला आले आहेत.

**लक्ष्मण :** होय ? पण तुलसीची अन् यांची झोंबाझोंबी कां चालली होती ?

**तुलसी :** अवो, ह्यो-

**उर्मिला :** ( त्याला डोळयानं खुणावून ) यांनीं कुस्तीच्या बढाया मारायला सुरवात केली तेव्हां तुलसी म्हणाला बघूं तरी तुमच्या हाताची पकड.

**लक्ष्मण :** ( हंसून ) आमचा तुलसी म्हणजे मोठा हा आहे.

( बिहारीलालला ) या हो या, इकडे या.

**उर्मिला :** लाहोरकडचे आहेत हे. मुद्दाम तुम्हांला भेटायसाठीं आले आहेत.

**राघव :** असं ? वा, बसा ना. जानकी, तुला बरं वाटतंय ना ?

**तुलसी :** तुझं डोकं दुखतंय नव्हं काय ? अस्प्रोचं पाकीट घेऊन आलों, पर त्ये द्यायचं इसरलोंच कीं. ( पाकीट पुढें करतो. )

**जानकी :** मला नको. ( मान खालीं घालून बसते. )

**उर्मिला :** अरे तुलसी, पाहुण्यांना दे ते. त्यांचं डोकं चढलं आहे.

[ तुलसी बिहारीलालपुढें पाकीट करतो, बिहारीलाल तें घेऊन चुरगळून फेकून देतो. ऊर्मिलेकडे पाहतो. चरफडून पुटपुटतो. ]

**बिहारीलाल :** ( तिच्याकडे रागानें पहात ) तें सारं महाग पडणार आहे तुम्हांला, ध्यानांत ठेवा.

**राघव :** ( आश्चर्यानें ) म्हणजे काय ?

**उर्मिला :** यांची सगळी हाकिकत ऐकल्याशिवाय कळायचं नाहीं तुम्हांला.

**राघव :** ( बिहारीलालकडे बघून ) अच्छा ! बोला.

**उर्मिला :** ( बिहारीलालला ) हं, सांगा आतां तुमची हकीगत.

**बिहारीलाल :** हकीगत काय, साधी आहे. मी आणि माझ्या दोस्तांनीं या बाईला पळवून नेली होती. हिनं माझे पाय धरले, पांच हजार रुपये द्यायचं कबूल केलं, म्हणून माझ्या दोस्तांना फसवून, हिला दिल्लीस आणून निर्वासितांच्या छावणींत मीं सोडली. म्हणून ती घरीं आली. माझे पैसे मागायला मी आलों आहे.

**लक्ष्मण :** तुला पैसे हवेत ! पळविणारा लुटारूही तूंच. आणि सोडविल्याबद्दल बक्षीस मागणाराहि तूंच होय ? चल, चालता हो. एक पैसुद्धां मिळायची नाहीं तुला.

**उर्मिला :** झालं ? सांगितलीत तिच्या मंडळींना हकीगत ? मिळाले तुमचे पैसे तुम्हांला ? ( हंसते )

**बिहारीलाल :** बाई, हें हसणं तुला फार महाग पडणार आहे. बुड्रं घात माझे पैसे बुडाले तर. पण लक्षात ठेवा, ही जानकी आमच्या ताब्यांत पांच महिने होती. ही बाटलेली लुटलेली औरत आहे.

**जानकी :** खोटं बोलूं नकोस चांडाळा. सांग हें खोटं आहे म्हणून. ( राघव आणि लक्ष्मण यांच्याकडे पाहून ) खोटं आहे, हें साफ खोटं आहे.

**बिहारीलाल :** ( हंसून ) तुझ्या शब्दावर विश्वास कोण ठेवील ?

**जानकी :** कोणी ठेवला नाहीं तरी परमेश्वर ठेवील.

**बिहारीलाल :** परमेश्वराच्या घरीं राह्यचं नाहीं तुला. खानदानवाल्यांची अब्रू चव्हाट्यावर आली कीं तिचे तुकडे गिधाडाप्रमाणें चघळणाऱ्या दुनियेंत राह्यचं आहे तुला. माझे पैसे मुकाट्यानं द्या नाहींतर, मी साऱ्या गांवाला सांगेन कीं शितोळ्यांची सून बाटलेली, लुटलेली औरत आहे.

**जानकी :** चांडाळा, असं खोटं बोलतांना तुझी जीभ झडून कशी पडत नाहीं.

**राघव :** कलियुगांत ती मुळापासून उपटावी लागते.

**लक्ष्मण :** पाजी, आपले शब्द परत घे. जानकीपुढें नाक घांसून तिची क्षमा माग. नाहींतर तुझ्या प्राणांच्या चिंध्यांनीं तिची अब्रू पुसून काढतों मी.

**राघव :** लक्ष्मण, खून करशील त्याचा.

**लक्ष्मण :** काय जग ओसाड पडेल ? मरूं दे. हिंस्र श्वापदांना मारायला परवाना आहे. ए पाजी, बोलशील पुन्हां ?

**बिहारीलाल :** खुशाल घे माझा प्राण. मेलों तरी भूत होऊन जगाला ओरडून सांगेन कीं, शितोळ्यांच्या सुनेची इज्जत—

**लक्ष्मण :** हरामखोर ! ( त्याचा गळा दाबतो. )

**बाबासाहेब :** ( प्रवेश करून ) लक्ष्मण, सोड त्याला. त्याचं नरडं दाबून गांवाचं तोंड बंद होणार नाहीं. ग्वाल्हेरीची गटारं वहायची थांबणार नाहींत. त्याचा श्वास बंद झाला म्हणून वाऱ्यावर घुमणारी शितोळ्यांची बेइज्जत आतां थांबत नाहीं.

**जानकी :** बाबासाहेब !—

**बाबासाहेब :** लक्ष्मण, सोड त्याला आणि बाहेर हाकून दे.

**बिहारीलाल :** ( कपडे साफ करीत जातां जातां ) पांच हजार रुपये देतां येईनात आणि म्हणे शितोळे सरदार ! म्हातारबुवा, ठेवा घरांत खुशाल हें कळकलेलं भांडं. ( मोठ्यांदा हंसतो व चटकन् निघून जातो. )

**बाबासाहेब :** राघव, लक्ष्मण जरा आंत या. मला तुमच्याशीं कांहीं बोलायचं आहे. ( ते तिघेही आंत जातात. )

**उर्मिला :** जानकी, पाहिलंस ? त्या दुष्टाला तूं उगीच भीत होतीस. त्यानं बडबड केली, पण झालं कां कांहीं ? आतां निर्धास्त रहा.

**जानकी :** पण बाबासाहेब—

**उर्मिला :** माणूस आहेत ते. तुझे सासरे आहेत. राघव लक्ष्मणासारख्या सुपुत्रांचे थोर वडील आहेत. तुझ्यावर त्यांची ममता आहे.

**जानकी :** भीतीनं माझ्या जिवाचा थरकांप होतो.

[ राघव येतो व जानकीकडे पाहात राहतो. मागोमाग लक्ष्मण रागारागानं आंत पाहात येतो, जानकीजवळ येऊन उभा राहतो. शेवटीं बाबासाहेब येतात.]

**बाबासाहेब :** राघव, माझी आज्ञा ऐकलीस ना ?

**राघव :** ऐकली.

**बाबासाहेब :** मग ?

**राघव :** बाबा, आजपर्यंत तुमची आज्ञा शिरसावंद्य मानीत आलों. तुमचा शब्द कधीं खालीं पडूं दिला नाहीं. तुमच्या आज्ञेचं पालन करण्यांतच माझं कल्याण आहे अशी श्रद्धा मीं ठेवली. पण तुम्ही आपल्या या आज्ञेनं माझ्या या श्रद्धेवर घांव घालीत आहांत. बाबा, क्षमा करा, पण ही कठोर आज्ञा परत घ्या.

**बाबासाहेब :** छे. छे. ती आज्ञा काय मी अविचारानं केली आहे म्हणून मी परत घेऊं ? जानकी घरांत आली तेव्हांपासून या गोष्टींचा मीं नीट विचार केला आहे. हा क्षण कधीं येऊं नये म्हणून रोज प्रभुरामचंद्राची मीं प्रार्थना केली. पण कदाचित् हा क्षण येईल हा संभवदेखील मला दिसत होता. आणि तो आल्यावर माझं कर्तव्य कोणतं याचा विचारहि मी करून ठेवला होता. जानकीनं हें घर सोडून जायलाच पाहिजे. माझी आज्ञा मी परत घेणं शक्य नाहीं.

**जानकी :** लग्न होऊन मी तुमच्या घरांत आलें त्या क्षणांपासून तुम्ही माझा पित्याप्रमाणें संभाळ केलात. माझ्यावर केवढी ममता केलीत ! ती सारी ममता एकदम नाहीशी झाली ?

**बाबासाहेब :** मुली, तुझ्यावरची माझी ममता अजूनहि कायम आहे. पण घराण्याच्या अब्रूवरची माझी निष्ठा तिच्याहून मोठी आहे! असायलाच हवी. तुला घराबाहेर जा म्हणून सांगण्यावांचून दुसरा मार्ग मला दिसत नाहीं.

**लक्ष्मण :** बाबा, आपल्या संसाराची शोभा म्हणून तुम्ही आजपर्यंत जिचं नेहमीं कौतुक केलंत त्या या जानकीला तुम्ही घरांतून बाहेर काढणार ? इतके कठोर कशानं झालांत ?

**बाबासाहेब :** या क्षणीं कठोर झाल्यावांचून घराण्याची अब्रु मला संभाळतां यायची नाहीं. शरीराचा एखादा अवयव कुजला तर तो कितीहि शोभिवंत असला तरी कापून टाकावा लागतो. नाहींतर सबंध शरीर नासेल अशी भिति असते. राघव, माझी आज्ञा तूं जानकीला सांग.

**राघव :** बाबा, तुमच्या या आज्ञेनं कुणाचं कल्याण होणार आहे ? घराची अब्रु घराची अब्रु असं तुम्ही म्हणतां. पण घर माणसासाठीं असतं. माणसं घरासाठीं नसतात. जानकीला दुःखांत लोटूनहि सांभाळली पाहिजे इतकी अब्रु ही चीज मोठी आहे ?

**बाबासाहेब :** खचित मोठी आहे. घराण्याची अब्रु डोळ्यांना दिसत नाहीं, हाताला लागत नाहीं पण सगळ्यांत मोठी संपत्ति ती आहे. शितोळ्यांच्या घरावर निष्कलंक अब्रूचं निशाण अखंड फडकत राहिलं म्हणूनच समाजांत मला मान्यता मिळाली. माझे मुलगे मोठेपणानं वावरले. माझ्या सुना गृहलक्ष्मी म्हणून मिरवल्या. अब्रू असेल तर माणसांना किंमत आहे. त्या अब्रूचा निर्मळपणा राखण्यासाठीं प्रसंगीं मायेचं भस्म करावं लागतं. राघव, ही जानकी तुझी पत्नी म्हणून या घरांत यापुढें नांदूं शकत नाहीं. तिला जायला सांग.

**राघव :** बाबा, काळजाला घरं पाडणारी तुमची ही कठोर आज्ञा जानकीला कशी सांगू ? या प्रेमाच्या मूर्तीला घराबाहेर जा म्हणून कसं सांगू ? प्रभु रामचंद्राचं भाग्य माझ्या वाट्याला आलं, मला ही धर्मपत्नी मिळाली. ती देवी जानकी, आणि ही माझी जानकी, कांहीं अंतर आहे काय ?

**बाबासाहेब :** लोकापवादाचा कलंक टाळण्यासाठीं रामचंद्रानंसुद्धां जानकीचा त्यागच केला होता.

**उर्मिला :** पण सीतेनं यज्ञकुंडांत उडी घेतली तेव्हां ती शुद्ध ठरली आणि रामचंद्र मूर्ख ठरला. पण त्या पुराण्यांतल्या गोष्टी हव्यात कशाला ? आपण कुणी अवतारी देव नाहीं. माणसं आहोंत. बाबा, माणुसकीला जागा, आणखीं जानकीला जवळ घ्या.

**लक्ष्मण :** तिला सांगा, कांहीं झालं तरी हें घर तुझं आहे.

**बाबासाहेब :** हें घर तिचं नाहीं, तुझं नाहीं, राघवाचं नाहीं. ज्यांनीं अब्रू प्राणापलीकडे सांभाळली अशा शितोळ्यांच्या अनेक पिढ्यांचं हें घर आहे. कलंकित स्त्री इथें राहूं शकत नाहीं.

**जानकी :** कलंकित कलंकित म्हणून पुनः पुन्हा मला कां डागतां ? मी कलंकित नाहीं. मी शुद्ध आहे. माझं शील शुद्ध राहिलं नसतं तर मी या घराची पायरी चढलेंच नसतें. माझे प्राण मीं शिल्लकच ठेवले नसते. मी पवित्र आहे म्हणून राघवकडे परत आलें. मी शुद्ध आहे. काय करूं म्हणजे माझी शुद्धता तुम्हाला पटेल ? कुणाची शपथ घेऊं ? ( राघवचा हात धरते )

**राघव :** जानकी, शपथ कशाला हवी ? तुझ्या हाताचा एकच स्पर्श तुझ्या पावित्र्याची साक्ष पटवायला पुरे आहे. शुद्ध सोन्याचा ओझरता स्पर्श झाला तरी दगडावर सुद्धां चटकन साक्षीची रेघ उठते. बाबा, हिच्या शुद्धत्वाबद्दल शंका कोण घेईल ?

**बाबासाहेब :** कोण घेईल ? तो बिहारीलाल काय बोलला तें प्रत्यक्ष ऐकलंस. लोक काय बोलूं लागले आहेत तें तुलसीला विचार. शाळेंत मंजूची कशी कुचेष्टा होते तें ती तुला सांगेल. पांचामुखीं परमेश्वर असतो. तो परमेश्वर जानकीला कधीं पवित्र समजणार नाहीं. त्या परमेश्वराचाच निर्णय मी बोलून दाखवितों आहे. जानकीनं हें घर सोडलं पाहिजे.

**राघव :** पण बाबा—

**बाबासाहेब :** राघव, हा क्षण माझ्या आणि तुझ्या कसोटीचा आहे. मला माझं अंत:करण घट्ट केलंच पाहिजे. तूं माझ्या आज्ञेबाहेर नाहींस अशी माझी खात्री आहे. इथें ग्वाल्हेरीस जे पहिले शितोळे आले त्या आबासाहेब शितोळ्यांचा मुलगा एका लढाईंत शत्रूला पाठ दाखवून परत घरीं आला असा लोकापवाद



नो दि ...........

आल्याबरोबर आबासाहेबांनीं आपल्या हातानं आपल्या मुलाचा शिरच्छेद केला. शितोळयांच्या घराचा लौकिक असा तेजस्वी आहे !

**उर्मिला :** पण बाबा, शितोळयांच्या दाराशीं कुणाहि निराश्रितानं यावं आणि आसरा शोधावा असाहि लौकिक आहे ! मग ही जानकी तर तुमची सून आहे. तिला दया दाखविणं तुमचं कर्तव्य नाहीं काय ?

**जानकी :** ऊर्मिले, कशाला विचारतेस ? दयेची भीक मागून या घराचा आश्रय मिळविण्याची इच्छाच मला आतां उरलेली नाहीं. मीं कोणता गुन्हा केला आहे म्हणून सासऱ्याची दया मागूं ? समाजाची दया मागूं ? माझ्या बापाचं घर जळलं, प्राण गेला, हा काय माझा गुन्हा ? लुटारूंच्या हातीं मी सांपडलें हा काय माझा गुन्हा ? माझ्या शीलाची शंका घेणाऱ्या पांच माणसांना बाबासाहेब, तुम्ही परमेश्वर मानता. गुंडांनीं माझ्या दादांच्या मानेवर घाव घातला, घर पेटवून दिलं, मला फरफरा ओढली त्यावेळीं हा पांचामुखी परमेश्वर खुशाल झोप घेत कां पडला होता ? अब्रूचा बकवा करणारा हा समाज त्या संकटाच्या वेळेस मला सोडवायला आला होता काय ? मी संकटांत सांपडलें तेव्हां माझ्या अब्रूचं– शितोळयांच्या घराच्या अब्रूचं रक्षण तुम्ही केलं नाहीं ! मीं केलं ! तुम्ही पुरुषांनीं अब्रूच्या गोष्टी नुसत्या बोलाव्या, ती राखण्याचं अन् वाढविण्याचं दिव्य स्त्रियाच करतात. पुरुषांची ही दुनिया अजब आहे. स्त्रियांना पळविणारे पुरुषच, त्यांच्या शीलावर टपणारे पुरुषच, आणि तुझं शुद्धत्व सिद्ध कर असं स्त्रीला म्हणणारे पुरुषच ! लुटारू, पापी, राक्षस, सासरे, नवरे, फिर्यादी, न्यायाधीश, सगळे पुरुषच ! पांचामुखीं परमेश्वर म्हणणाऱ्या या पुरुषांच्या दुनियेंत सारी स्त्रीजात पिचून निघते आहे ! जिथें दया नाहींच तिथें मागायची कशाला ? मला कुणाची दया नको. दयेची भीक मागून मला या घरांत रहायचं नाही. त्यापेक्षां हें घर सोडून–( रडूं लागते. )

**तुळसी :** धनी, मी नोकर माणूस लहानग्या तोंडांत मोठा घास घेतो म्हनाल. पर या घराच्या लक्षिमीचा हा छळवाद मला बघवत न्हाई. या रागवच्या लग्नांत ग्वालेर शहरानं कदी बगितली नसल अशी थाटाची वरात वाजत गाजत या वाड्यांत आली. देवघरांत देवाम्होरं रागवनं तबकामदल्या तांदळांत सोन्याच्या अंगठीनं हौसेनं

ठरीवलेलं जानकी असं नांव लिव्हलं. मग शेल्याला नी उपरन्याला गांठ दिलेली रागव अन् जानकी वर आली तवा आपुन तिला मांडीवर घिऊन लई पिरेमानं तिच्या तोंडांत साकर घातलीत. तिचं दादा डोळं पुशीत आपल्याला म्हनालं हिला कधीं अंतर दिऊं नका. आपल्या तोंडून सबुद फुटंना. आपला गळा दाटून आला व्हता. आतां त्याच जानकीला आपुन घराभाईर जायला सांगतां ?

**बाबासाहेब :** होय. ज्या मीं गृहप्रवेशाच्या वेळेस सुनेच्या तोंडांत साखर घातली तोच मी आज तिला घराबाहेर काढतों आहे, यांतच तुमच्या सगळ्यांच्या प्रश्नांचं उत्तर आहे. लोकापवादानं कलंकित झालेली स्त्री घर सोडून गेलीच पाहिजे. न्यायासाठीं निष्ठुरपणा केलाच पाहिजे.

**लक्ष्मण :** तुमच्या तोंडचा न्याय हा शब्द मला आतां ऐकवत नाहीं. त्याची मला किळस येते. केवळ लोकांच्या निंदेला भिऊन तुम्ही सुनेच्या सुखाची होळी करायला निघालां. तुमच्या जागीं एखादा सुविचारी धैर्यशील सासरा असता तर त्यानं सांगितलं असतं, लोकांनीं वाटेल तें म्हटलं तरी माझी सून पवित्र आहे हें मला माहीत आहे. मी तिला कदापि अंतर देणार नाहीं. असं तुम्ही केलं असतं तर तो खरा न्याय ठरला असता. खरं धैर्य म्हणतां आलं असतं. तुम्ही भेकडपणा करतांहात. तुमची न्यायाची बडबड म्हणजे भेकडपणा लपवायसाठीं त्यावर घातलेलं पांघरूण आहे. मला तुमची किळस येते.

**बाबासाहेब :** लक्ष्मण, तोंड बद कर. जें बोललास त्याची शरम वाटली पाहिजे तुला.

**लक्ष्मण :** तुम्ही जें करताहांत त्याची मला शरम वाटते.

**बाबासाहेब :** वाटली तर ती आपल्याजवळ ठेव. मला सांगूं नकोस. या वेळीं मी कुणाचं कांहीं ऐकणार नाहीं.

**ऊर्मिला :** हट्टी ! निर्दय !

**जानकी :** ऊर्मिले, लक्ष्मण, आतां तुम्ही एक शब्द बोलाल तर माझ्या गळ्याची शपथ आहे. मी जातें !

**उर्मिला :** अग कुठें जाशील ? ( तिला बिलगते. )

**जानकी :** खरंच ! कुठें ? माझे दादा मेले तेव्हां माझं माहेर संपलं ! आज माझं सासर संपलं ! या जगांत मला जागा उरली नाहीं. जिवंतपणीं मला मरण आलं !

मेलेल्या माणसालासुद्धां पांच माणसं पोचवायला जातात. मला पोंचवायला कोणी नाहीं. पण जातें. गेलं पाहिजे मला. सोड. मी जातें!

**उर्मिला :** कुठें ! अग कुठें ? राघव, बाबा ! हिनं कुठें जावं ? जानकी, कुठें जाशील ?

**जानकी :** गांजलेल्यांना, निराधारांना, अपंगांना, आंधळ्यांना वाट दाखविणारा परमेश्वर दाखवील त्या वाटेनं जाईन. बाबा, मी जातें. मला शेवटचा आशिर्वाद द्या ! लक्ष्मण, बाबांना सांभाळ ! उर्मिले, राघवला—

**लक्ष्मण :** नाहीं, वहिनी तुला मी जाऊं देणार नाहीं. ( तिला धरतो. )

**उर्मिला :** जानकी, मी तुला कशी जाऊं देईन ? ( तिला बिलगते. )

**तुलसी :** ( एकदम पुढें होऊन बाबासाहेबांचे पाय धरतो ) धनी ! मला हें बगवत न्हाई.

**बाबासाहेब :** तुलसी, ऊठ, दूर हो. लक्ष्मण, उर्मिले, जानकीची वाट सोडा. तिला जाऊं द्या. मुली, माझे तुला आशिर्वाद आहेत. प्रभु तुला अंतर देणार नाहीं !

**जानकी :** आतां मी निर्भय झालें. मी जातें. राघव, जातें !

**राघव :** जानकी ! थांब ! ( जवळ जाऊन ) एकटी जाऊं नकोस.

**जानकी :** एकटेपणा हाच आतां उरलेल्या आयुष्यांतला माझा सोबती. मला त्याचं भय वाटत नाहीं.

**राघव :** पण मला वाटतं. मी तुझा जन्माचा सोबती आहे. मी तुझ्याबरोबर येतों. बाबा, जानकीबरोबर मीहि जातो.

**बाबासाहेब :** ( आश्चर्यानं ) काय ? तूंहि जातोस ?

**राघव :** होय. होमांतल्या अग्निसमक्ष मीं हिचा हात हातांत घेतला. तो मला सोडतां येणार नाहीं, बापाची आज्ञा ऐकून वनवासाला निघालेल्या रामाबरोबर जानकी गेली. हिच्याबरोबर मला जायला हवं.

**बाबासाहेब :** तूं असा दुबळेपणा करशील अशी माझी कल्पना नव्हती. धर्मासाठीं आणि शीलासाठीं बायकोचा त्याग करतांना तूं कचरशील असं मला वाटलं नव्हतं. तूं असा आंधळा कसा झालास ?

**राघव :** बाबा, माफ करा. पण या क्षणाला तुमच्या हट्टीपणानं तुम्हांलाच आंधळं केलेलं आहे. धर्म आणि शील यांच्या खुळचट कल्पना उराशीं बाळगून आपण आपल्या समाजाचा घात आजपर्यंत पुष्कळ करून घेतला. परधर्मीयांनीं विहिरी- तलावांत मांसाचे तुकडे टाकले, आणि तें पाणी पिणारी गांवच्या गांवं बाटलीं असं समजून आपण आपल्या समाजाचे लचके तोडून त्यांच्या पदरांत टाकले. तसलाच मूर्खपणा आतां पुन्हां करायचा आहे काय ? गुंडांनीं पळविलेल्या स्त्रिया समाजांतून कायमच्या उठवायच्या आहेत काय ? अपहारावर अव्हेर हें औषध आहे काय ? त्या स्त्रियांना दूर लोटून आपले संसार उध्वस्त करून घ्यायचे आहेत काय ? देशाच्या फाळणींतून उठलेल्या हाहाःकाराला बळी पडलेल्या दुर्दैवी गृहलक्ष्मींना घराबाहेर काढून घराघराची फाळणीं करायची आहे काय ? आज अशा हजारों जानकी घरीं घरीं परत येत आहेत. त्यांना घरांचा आश्रय मिळाला नाहीं तर कुटुंबाचा आणि समाजाचा केवढा घात होईल याचा विचार करा. पण तुम्ही हट्टाला पेटलां आहांत. आंधळे झाला आहांत. तुमचं कर्तव्य तुम्ही करा. माझं मी करतो. मी जानकीबरोबर जाणार. जिथें जानकी तिथें मी !

**बाबासाहेब** मग हें शितोळ्यांचं घर ?

**राघव :** घर ? घराचं सौभाग्य गेल्यावर घर रहाणार आहे कुठें ? ही जानकी नुसती माझी पत्नी नाहीं. समाजाची शक्ति आहे. राष्ट्राची संपत्ति आहे. तुम्हांला ती दिसत नाहीं. घर तेवढं दिसतं आहे, मी जातों.

**बाबासाहेब :** ( काकुळतीनं ) राघव, तूंच कां हें बोलतो आहेस ?
( एकदम चर्या बदलून ) पण ठीक आहे. जा ! जा !

**उर्मिला :** लक्ष्मण, अरे हीं दोघं गेल्यावर आपण या घरांत दिवस कसे काढायचे ?

**लक्ष्मण :** कोण म्हणतो काढायचे ? ( तिचा हात धरून ) चल, आपणहि जाऊं. बाबा आम्हीही जातों.

**बाबासाहेब :** काय, तुम्ही दोघेहि निघाला ? मग हें घर ?

**लक्ष्मण :** आतां घर राहिलंय कुठें ?

**उर्मिला :** जानकीला जायला सांगितलंत तेव्हांच तुम्ही आपल्या हातांनीं हें घर नष्ट केलंत.

**बाबासाहेब :** नाहीं नाहीं ! पिढ्यान् पिढ्या अब्रुनं उभं राहिलेलं हें घर कधीं नाहींसं होणार नाहीं. जा ! तुम्ही खुशाल जा ! घराचा लौकिक नाहींसा झालेला पाहाण्या-पेक्षां तुम्ही सारे घराबाहेर पडलांत तरी तें पाहीन. लोकांना सांगेन, मला दोन मुलगे होते, ते मेले. दोन सुना होत्या त्याहि मेल्या. पण कुळाच्या अब्रुला मीं डाग लागूं दिला नाहीं. जा ! तुम्ही खुशाल जा !

[ " बाबा ! बाबा ! " असं मोठ्यांदा ओरडत मंजू धांवत जिन्यावर आलेली दिसते. तिथें ती पुन्हां ओरडते. " बाबा ! बाबा ! " ती धांवत खालीं येते. बाबासाहेब तिला पोटाशीं धरतात. ]

**बाबासाहेब :** ( राघव व लक्ष्मण वगैरेकडे पाहून ) जा ! तुम्ही खुशाल जा ! कुटुंबाचा हा नाजुक तंतु माझ्याजवळ आहे. या लाडक्या नातीला मी प्राणापली-कडे जपेन. घराण्याची अब्रु संभाळायला मी तिला शिकवीन. ( तिला अधिक जवळ ओढून घेऊन तिचा मुका घेऊं लागतात. )

**मंजू :** ( मुका घेऊं न देतां जानकीकडे ओढ घेत ) मला सोडा. माझ्या आईकडे मला जाऊं द्या. सोडा ! ( जानकीकडे धांवते व तिला बिलगते. ) मी माडीवर रडतां रडतां झोपले. किती वेळ झोपलें कुणास ठाऊक ? पण मग मला भयंकर स्वप्न पडलं. दुरून कुठून तरी तुझी हांक मला ऐकूं आली. फार भयंकर स्वप्न होतं तें. तूं मला टाकून जात आहेस असं स्वप्न—

**जानकी :** तें स्वप्न खोटं नाहीं मंजू. मी हें घर सोडून जाणार आहे.

**मंजू :** आई, मला दूर करूं नकोस.

**जानकी :** मी तुझी आई होते. आतां नाहीं !

**मंजू :** आई !

**जानकी :** मंजू, वेडी कां तूं ? माझी आई मेली तेव्हां मीं तिला असं धरून ठेवलं का ? दूर हो. मला गेलं पाहिजे.

**मंजू :** कां ?

**बाबासाहेब :** ( पुढें होऊन, मंजूला जवळ घेऊन ) मंजू इकडे माझ्याजवळ ये, तुझी आई हें घर सोडून जाणार आहे.

**मंजू :** कां ?

**बाबासाहेब :** तिला मीं जायला सांगितलं आहे.

**मंजू :** पण कां ? कां ?

**बाबासाहेब :** ( गांगरून ) कारण— तें मला सांगतां येत नाहीं. तूं अजून लहान आहेस. तुला तें कळायचं नाहीं.

**मंजू :** पण मला एवढं कळतं की ती माझी आई आहे. अन् ती फार चांगली आहे. सोडा मला. असं धरून काय ठेवतां ? सोडा ! माझ्या अंगाला हात लावू नका. आईला घरांतून जायला सांगितलंत तुम्ही ? मला तुमची किळस येते. ( धांवत जाते आणि जानकीला मिठी मारते. )

**बाबासाहेब :** मंजू, माझ्याकडे ये. जाऊं नकोस. मंजू !

**मंजू :** मी जाणार. खबरदार माझ्या अंगाला हात लावलांत तर ! मी जाणार !

**राघव :** बाबा, आम्ही जातों.

[ राघव, जानकी, वगैरेंच्या पाठमोऱ्या आकृतींकडे पहात असतांना बाबासाहेबांची चर्या अधिकच कावरी बावरी होते. ते हलकेंच दृष्टि वळवितात आणि दिवाणखान्यांत चहुं बाजूस पहातात. ]

**बाबासाहेब :** ( गांगरलेल्या आणि भेदरलेल्या नजरेनं ) सारेजण गेले ! मग घर राहिलं कुठें ? घर वाचवायला गेलों, तें घरच गमावून बसलो ! माझंच तर चुकत नसेल ? राघव, लक्ष्मण, जानकी, उर्मिला, मंजू या पांच जणांच्या मुखांनीं परमेश्वरच बोलला नसेल कशावरून ? या परमेश्वराशीं भांडून या घरांत एकटा राहून मी काय करूं ? प्रकाश गेला ! अंधार राहिला ! या अंधाराची—माझ्याच हट्टांची मला फार भीति वाटते ! राघव, जानकी ! परत फिरा ! अरे परत या !

[ ओरडतां ओरडतां त्यांची नजर रामपंचायतनाच्या तसबिरीकडे जाते. "जागे रहा ! जागे रहा !" असा त्या तसबिरीतूनच निघणारा आवाज, आपणाला ऐकूं येत आहे असा त्यांना भास होतो. ते दचकतात आणि लक्ष देऊन ऐकूं लागतात ]

**आवाज :** काळ बदलेला आहे. अब्रूच्या जुन्या कल्पना टाकून द्या. जागे रहा ! नव्या जगाकडे नव्या दृष्टीनं पहायला शिका. जागे रहा ! जानकीसारख्या स्त्रियांना घराबाहेर घालवाल तर घराची स्मशानं होतील. समाजाची छकलं उडतील. राष्ट्र नामशेष होईल. जागे रहा. जागे रहा !

**बाबासाहेब :** होय. मला जागं राहिलं पाहिजे. जागं राहिलं पाहिजे ! ( दाराकडे जाऊन ओरडतात ) जानकी, जाऊं नकोस. ये. अरे तुम्ही सारे गेल्यावर मी जिवंत कसा राहीन ? राजा दशरथाप्रमाणें राघवा, लक्ष्मणा असा आक्रोश करीत मी मरावं अशी तुमची इच्छा आहे काय ? ( वात झाल्याप्रमाणें हातवारे करीत ) जाऊं नका ! जाऊं नका ! ( खालीं पडतात. " धनी ! धनी ! " असें ओरडत तुलसी धावून त्यांच्याजवळ जातो. ) जानकी, ये ! जानकी, जानकी !

[ जानकी दारांत येते. बाबासाहेब पडलेले दिसतांच ती झटकन त्यांच्याजवळ जाते. ]

**जानकी :** आपण मला हांकमारलीत काय ?

**बाबासाहेब :** ( आनंदानं ) तूं आलीस ? खरंच आलीस ? अशीच सदा या घरांत रहा.

**जानकी :** आपली परवानगी आहे ?

**बाबासाहेब :** माझं मागणं आहे. राघव-लक्ष्मण कुठें आहेत ?

( ते दोघे आणि ऊर्मिला व मंजू दारांत आलेलीं दिसल्याबरोबरं उठून हात पसरतात. ) राघव, लक्ष्मण, अरे माझ्या मिठींत या. ( ते दोघे त्यांना मिठी मारतात व कोचाकडे आणून बसवितात. ) राघव जानकीचा हात धर आणि माझ्याजवळ बस. मंजू, बेटा ये. ऊर्मिले, लक्ष्मणा, अरे जवळ या. तुलसी हें रामपंचायतन डोळे भरून बघ. त्या तसबिरींतल्यासारखं हुबेहूब आहे ना ?

**तुलसी** : अगदीं हुबाहूब.

**लक्ष्मण** : नीट बघ. हुबेहूब नाहीं.

**तुलसी** : न्हाई ? त्यें कसं ?

**लक्ष्मण** : त्या तसबिरींतली जानकी रामाच्या मांडीवर बसली आहे. तशी बसली आहे का ही जानकी ? ( सगळीजण हंसतात )

**बाबासाहेब** : तुलसी, अरे रामायणांतला आपला नेहमीचा श्लोक आपला म्हणूं या.

[ सर्वजण श्लोक म्हणूं लागतात. पडदा पडतो. ]

शेवटचा अंक सुंदर आहे
अभिप्राय : रसिक वाचक

## प्रो. ना. सी. फडके यांचें नाट्य–वाङ्मय

जानकी
संजीवन
तोतया नाटककार
काळे–गोरे
क्षमेसाठीं अपराध
आगलावी
जडवाची देवी
युगांतर

BVBK-0404567